आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ मार्च २०१२ | वर्ष २८ | अंक २४

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

फायदा घे ओरबाडून
शेतकऱ्याला दे पन्हाटी
पोशिंद्यालाच नागवं करी
कशी ही जगरहाटी

## वस्त्रोद्योगाच्या 'कल्याणा' शेतकऱ्यांच्या विभूती



कापसावरील निर्यात बंदीमागे काही काळेबेरे आहे हे नक्की. कारण देशातल्या अनेक निर्यातदारांनी आपल्याच परदेशातील उप-कंपनीला गाठी विकल्याचा संशय आहे. ज्या दिवशी आपण निर्यातीवर बंदी घातली त्याच दिवशी आंतरराष्ट्रीय बाजारात गाठींचे भाव साधारण रुपये ६०० ने वाढले. म्हणजे १० लाख गाठींमागे रुपये ६० कोटी! एक बंदी लावणे आणि ती पुन्हा उठवणे यातून केवढा मोठा घोटाळा होऊ शकतो याची ही एक झलक आहे.

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक २४ । २१ मार्च २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठावरील छायाचित्र
**श्रीकृष्ण उमरीकर**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग

जागरण
**वस्त्रोद्योगांच्या 'कल्याणा' शेतकऱ्यांच्या विभूती**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ३

आजकाल
**निर्यातबंदी 'उठली-बसली'चा दरबारी खेळ**
ज्ञानेश्वर शेलार ........ ७

मुद्दा
**किरकोळ बाजारात थेट गुंतवणुकीचा उल्लेखही नाही**
शरद जोशी ........ ६

विचार
**खसखशीवर बंदी हीच गुन्हेगारीची जननी**
अमर हबीब ........ १०

**शेतकऱ्यांची हेटाळणी कधी थांबणार?**
ज्ञानदेव राऊत ........ ११

कॉमन नॉन सेन्स
**पराभव : काँग्रेस, भाजप आणि अण्णा आंदोलनाचा!**
सुधाकर जाधव ........ १२

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १४

# बंदी लावू बंदी काढू शेतकऱ्याला मातीत गाडू

गेली ३२ वर्षे शेतकरी संघटना सातत्याने असं सांगत आली आहे, 'शेतकऱ्याचे मरण हेच शासनाचे धोरण' पण हे कोणाला विशेषतः डाव्या विचारवंतांना फारसे पटत नव्हते. परवाच्या कापूस निर्यातबंदीच्या हप्ताभराच्या खेळीने सगळ्यांसमोरच परत एकदा जुनीच गोष्ट स्पष्टपणाने आली आहे. मान्य करायचं की नाही, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. प्रचंड प्रमाणात विरोध आणि असंतोष जाणवताच घातलेली बंदी काढण्याचं नाटक व्यापार मंत्री आनंद शर्मा यांनी केलं. इथून पुढे जी काही चौकशी व्हायची ती होत राहील. जे काही आरोप, प्रत्यारोप व्हायचे ते होत राहतील; पण या निमित्ताने संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारची नियत स्वच्छपणे समोर आली आहे. 'आम आदमी'चं नाव घेत चालवल्या जाणाऱ्या सगळ्या योजना या प्रत्यक्षात 'आम आदमी'ला खड्ड्यातच घालणाऱ्या आहेत. हे वेगळं सांगायची गरज नाही. कापूस निर्यातबंदीच्या खेळामुळे परत एकदा हा विचार करण्याची गरज आली आहे. शासकीय हस्तक्षेप असावा की नसावा, खरे तर हा आता प्रश्नच उरलेला नसून शासकीय हस्तक्षेप पूर्णपणे हद्दपार झाला पाहिजे, याच निष्कर्षाला सगळे येऊन ठेपले आहेत. किंबहुना परिस्थितीही तशीच आहे; पण तसं मान्य न करता काहीतरी उचापती करून विकासाच्या गाड्याला खिळ घालायची आणि आपलं अस्तित्व सगळ्यांच्या नजरेस आणून द्यायचं, असला कारभार नोकरशाहीने आणि स्वाभाविकच त्यांच्या बोलवत्या राजकीय धुरीणांनी दाखवून दिला आहे. महाराष्ट्रातील निवडणुका आणि उत्तरप्रदेश पंजाबातील निवडणुकांनीही सर्वसामान्य जनतेचा कल काँग्रेसविरोधी असल्याचे स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय म्हणवून घेणाऱ्या काँग्रेस आणि भाजपला फक्त जागाच नव्हे, तर मतांच्या टक्केवारीनेही धोबीपछाड देऊन जनतेने गप्प केले आहे. पण यापासून कुठलाही बोध घ्यायची तयारी या सरकारची आहे, असे दिसत नाही. नसता कापसाच्या निर्यातबंदीचा खेळ करण्याची उठाठेव सरकारने केलीच नसती. यावरून शेतीविषयक धोरणांमध्ये शेतकऱ्यांच्या विरोधातील सूत्र जाणवल्याशिवाय राहात नाही. म्हणजे एकीकडे अन्नधान्य सुरक्षा विधेयकाची चर्चा करायची आणि दुसरीकडे शेतकरी जगूच नये, अशी व्यवस्था करायची. ग्रामीण रोजगार योजनांसारख्या शेतीच्या मुळावर उठणाऱ्या योजना राबवायच्या आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचं आम्ही भलं करतो आहोत म्हणत अनुदानांची खैरात उधळायची ही खैरात शेतकऱ्यांच्या पदरी पडू नये, याची मात्र पुरेपूर काळजी घ्यायची. प्रश्न इतकाच आहे, असला खेळ किती दिवस चालणार? हे वारंवार सिद्ध झालेलं आहे- इतर कुठल्याही उत्पादनांपेक्षा शेती उत्पादनाच्या माध्यमातून परकीय बाजारपेठ आपण ताब्यात घेऊ शकतो. यातून आपली निर्यात वाढून परकीय चलन काही प्रमाणात मिळू शकते. ज्या आयटी क्षेत्राचा गवगवा मागच्या दशकात करण्यात आला होता, त्या क्षेत्राचं पितळ आता उघडं पडत चाललं आहे. पायाभूत उद्योग सुधारलेच नाहीत, तर नुसते सेवाक्षेत्र विस्तारून चालत नाही. त्याचबरोबरीने उद्योगांना कच्चा माल किंबहुना एका अर्थाने भांडवलच पुरवणारे शेतीक्षेत्र मागास ठेवून जमत नाही. कामगारांच्या शोषणावर उद्योगी भांडवलाची निर्मिती होते हे मांडणारी विचारसरणी मुळातच कच्चा माल जो मिळतो तो शेतीच्या शोषणातूनच मिळतो हे सांगत नाही. बाकी सर्व मोठमोठ्या गोष्टी करत असताना सगळ्यांच्या मुळाशी असलेल्या शेती उद्योगाबाबत आम्ही उदासिनता दाखवतो. त्याच्या जिवाशी खेळ होईल असे डावपेच आखतो. याचाच परिणाम म्हणजे गेल्या सत्तर एक वर्षांत हे क्षेत्र उजाड होत गेले. लोकांचे स्थलांतर झाले. तरीही शेतीवरची लोकसंख्या बरीचशी शिल्लक आहे. जिच्या कल्याणासाठी इतकंच नव्हे, एकूणच सगळ्या देशाच्या कल्याणासाठी तिची उपेक्षा थांबवणं अत्यंत आवश्यक आहे. खुली व्यवस्था आल्याच्या नंतर शेतीला खुलेपणाचा वारा लागेल, अशी अपेक्षा करण्यात येत होती. प्रत्यक्षात मात्र तसं काही, घडलं नाही. वेगवेगळ्या निमित्ताने शेतीभोवती कुंपणं घालणं चालूच आहे. 'खुल्या व्यवस्थेमध्ये काही खरं नाही हे आम्ही तुम्हाला सांगतच होतो,' असे बाष्कळ उद्गार डावे विचारवंत बऱ्याचदा काढताना आढळतात. त्या सगळ्यांची तोंडं आता गप्प का आहेत? गेल्या सात दिवसांतल्या निर्यातबंदीची कारणमीमांसा हे डावे विचारवंत काय म्हणून करणार आहेत? जर जागतिक पातळीवरती व्यापार खुला राहिला, तर त्याचा फायदा इतर कशापेक्षाही शेतीला नेहमीच होतो, हे सिद्ध झालेलं आहे. जेव्हा जेव्हा कृत्रिमरीत्या हस्तक्षेप केल्या जातो, तेव्हाच ही बाजारपेठ नासते आणि शेतकऱ्याचे प्राण कंठाशी गोळा होतात. आता एकदा या सगळ्यांचा विचार करून शेतमालाच्या व्यापारविषयक निश्चित धोरण ठरविण्यात यावे. खरे तर आंतरराष्ट्रीय दबाव अशा तऱ्हेने कार्यरत आहे. दिल्लीच्या सरकारला मनात असूनही असले छचोर चाळे फार काळ करता येणार नाहीत. मागचं अख्खं दशक युद्ध, शीतयुद्ध आणि युद्धखोर कारवाया यांनी गाजलं. त्याने संपूर्ण जगाला वेठीस पकडलं. मोठमोठ्या अर्थव्यवस्थांचा डोलारा साफ कोसळला. ज्याचाच परिणाम म्हणजे १९९१ नंतर खुलेपणाची चर्चा करणं सर्वांनाच भाग पडलं. हे शतक व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीचं आहे. ही अर्थव्यवस्था जिला बाजारू अर्थव्यवस्था म्हणून कितीही हिणवलं तरी, तीच पुढे नेणारी ठरणार आहे. हे निश्चित आहे. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना तेव्हाचे प्रस्थापित नोकरदार असं हिणवायचे, 'अरे इंग्रज इतका बलवान आहे, तो तुमच्या या पोरकट चाळ्यांनी, खादीच कपडे वापरल्याने, चरख्यावर सूत कातल्याने स्वातंत्र्य द्यायला मूर्ख थोडाच आहे.' पण आश्चर्य म्हणजे असं म्हणणारेच मूर्ख ठरले. खादी घालणारे आणि चरख्यावर सूत काढणारे शतकाचा उंबरठा ओलांडून स्वातंत्र्याच्या वाटेने कितीतरी पुढे निघून गेले. आजपरत हीच परिस्थिती आहे. वेगवेगळ्या मार्गाने बंदी घालणारे अडथळे आणणारे स्वतःला शहाणे समजत आहेत; पण उद्याचा काळ हा सर्व बंधनांतून मुक्त होऊन जागतिक पातळीवर एका वेगळ्या स्वातंत्र्याचा प्रत्यय मिळण्याचा काळ आहे. व्यापारातील ही क्षुद्र बंधने गळून पडतील आणि सगळ्यांनाच विशेषतः शेतकऱ्याला आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त होईल.



# वस्त्रोद्योगाच्या 'कल्याणा' शेतकऱ्यांच्या विभूती

**इतर कोणात्याही प्रकारच्या मालाच्या निर्यातीवर सरकार बंदी घालत नाही; पण देशातल्या आजारी, कमजोर, अकार्यक्षम अशा कापड उद्योगांसाठी मात्र तातडीने कापसाच्या निर्यातीवर बंदी घालून आधीच हलाखीच्या परिस्थितीमध्ये कसेबसे दिवस काढणाऱ्या शेतकऱ्याचा पुरता नायनाट व्हावा असा निर्णय घेते! केवढा घोर हा अन्याय; पण त्या बंदीचा सर्वांनीच विरोध केल्यामुळे सरकारला ती मागे घ्यावी लागली. या बंदीमागे काही काळेबेरे आहे हे नक्की. कारण देशातल्या अनेक निर्यातदारांनी आपल्याच परदेशातील उप-कंपनीला गाठी विकल्याचा संशय आहे. ज्या दिवशी आपण निर्यातीवर बंदी घातली त्याच दिवशी आंतरराष्ट्रीय बाजारात गाठींचे भाव साधारण रुपये ६०० ने वाढले. म्हणजे १० लाख गाठींमागे रुपये ६० कोटी! एक बंदी लावणे आणि ती पुन्हा उठवणे यातून केवढा मोठा घोटाळा होऊ शकतो याची ही एक झलक आहे.**



श्रीकृष्ण उमरीकर

पाच मार्चची सकाळ आठवली तर कापसाच्या व्यवसायात गुंतलेल्या कोणाच्याही उरात धडकीच बसेल. त्या दिवशी सकाळीच कापसाच्या निर्यातीवर सरकारने बंदी आणल्याचे जाहीर झाले आणि कापसाचे व्यवहारच थंडावले. पाकिस्तानातून कापसाच्या गाठी आयात झाल्या, तसेच कापड उद्योगाची हालत खराब त्यामुळे आधीच कापसाचे भाव पडलेले. त्यामुळे आपल्या मालाला बरा भाव मिळेल तेव्हाच कापूस विकायचा म्हणून शेतकऱ्यांनी बाजाराकडे पाठ फिरवलेली. त्यात ही निर्यातबंदी. होती नव्हती ती आवकही थंडावली. सगळे हवालदिल झाले. हे काय झाले? कसे झाले? कोणी केले? का केले? असे असंख्य प्रश्न सर्वांना पडले. हळूहळू चित्र स्पष्ट झाले आणि कळाले की कापड उद्योगाच्या 'कल्याणासाठी' शेतकऱ्यांच्या विभुती देण्यात आल्या आहेत. अर्थात हे 'कल्याण' वरकरणी जरी कापड उद्योगाचे आहे असे सांगण्यात आले तरीही या निर्णयामागे काही विशिष्ट लोकांचे हीत साधण्याचे कारण तर नाही ना? असल्यास त्याची चौकशी व्हावी म्हणून मी कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांतर्फे सर्वोच्च न्यायालयात दाद मागेन' असा ईशारा शरद जोशीसाहेबांनी दिल्यावर 'धृतराष्ट्र मनमोहनाने' आपल्या डोळ्यांवरची पट्टी काढली आणि काय झाले ते पाहून बहुदा आपले मौन सोडले, सोबतच निष्क्रियतेचा त्याग करून काही करण्याचे ठरविले. जे सौदे आधी झालेले आहेत त्यांची पुनर्तपासणी करण्यात येईल तसेच नवे निर्यात परवाने आत्ताच देण्यात येणार नाहीत असे जाहीर केले आणि कापूस उद्योगाला थोडा दिलासा दिला.

खरेतर कापूस पिकविणारा शेतकरी, सुतगिरणी मालक, कापड निर्माते आणि कपडे शिवणारे हे सगळे एकाच व्यवसायाचे घटक आहेत. हा व्यवसाय एखाद्या साखळीसारखा आहे. जसे साखळीतली कमजोर कडी साखळीला कमजोर बनवते तसेच या उद्योगाच्या साखळीमधील एका घटकाचे नुकसान म्हणजे पूर्ण उद्योगाचे नुकसान. तरीही सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे हे सर्व घटक एकमेकांचे विरोधी असल्यासारखे भासवण्यात येते आणि त्यातून संघर्ष निर्माण होतो. भारताने चीनचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून कापड उद्योगासंबंधी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली नाहीत तर देशातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्याचे आणि पर्यायाने कापड उद्योगाचे काही खरे नाही असेच म्हणावे लागेल.

**चीनचे उदाहरण**

१९८० नंतर चीनने कठोर प्रयत्न करून आणि व्यवसाय वृद्धीसाठी आवश्यक धोरणे आखून वस्त्रनिर्मिती क्षेत्रात आघाडी घेतली आहे. सर्वांत पहिले चीनने जुने, अकार्यक्षम असे १ कोटी चरखे बाद केले. सोबत १.२ कोटी मजुरांचा रोजगारही गेला; पण म्हणून त्याचा कोणी बाऊ केला नाही (आणि साम्यवादी (!) चीनमध्ये तो कोणाला करताही येत नाही हा भाग अलहिदा!). नाही तर आपल्या देशात अकार्यक्षम असल्याच्या कारणावरून एखाद्या कामगाराला कामावरून कमी केले तर जणू काही आभाळ कोसळले आहे अशा आविर्भावात कामगार संघटनांचे/कामगार 'सेनांचे' नेते गळा काढतात. बंद-संप वगैरे करतात आणि दादागिरी करून त्या कामगाराला पुन्हा कामावर घ्यायला लावतात! पण चीनमधे तसे काही झाले नाही. झालेला बदल लोकांनी खळखळ न करता स्वीकारला. का नाही स्वीकारणार? कारण याच दरम्यान सरकारने देशातील आधुनिक चरख्यांची संख्या १.८ कोटी वरून ५.५ कोटी केली! एवढेच नाही तर अत्याधुनिक मागांचे प्रमाण जे जगातील एकूण मागांच्या ६% होते ते वाढवून १५% केले! म्हणजे एकूण काय तर १.२ कोटी अकुशल मजूर कमी केले तर त्याच वेळी ४-५ कोटी दुसऱ्या मजुरांना कामाच्या संधी उपलब्ध करून दिल्या! आपला व्यापार जो १९८० मध्ये ४०० कोटी अमेरिकी डॉलर होता तो २००२ पर्यंत जवळपास १६ पट वाढवून ६,३०० कोटी अमेरिक डॉलर एवढा केला.

या मागे चीनी सरकारची दूरदृष्टी होती. १९९० च्या सुमारास जागतिक व्यापारात होणारे बदल लक्षात घेऊन चीनने आपले व्यापारी धोरण बदलले होते. म्हणून २००५ साली कापड उद्योगातील 'कोटा पद्धती' संपुष्टात आली तेव्हा तिचा सर्वांत जास्त फायदा चीनने उचलला आणि आपली कपड्यांची निर्यात ५००% वाढवली! चीनच्या आर्थिक प्रगतीमध्ये सिंहाचा वाटा त्या देशातील कापड उद्योगाचा आहे.

**भारताची केविलवाणी अवस्था!**

भारतातील कापड उद्योग मोठाच आहे; पण जुनाट-अकार्यक्षम आहे. तरीही एकूण औद्योगिक उत्पादनात त्याचा वाटा १४% आहे तर त्याच्या

 

निर्यातीतून आपल्याला मिळणारे परकीय चलन एकूण मिळणाऱ्या चलनांपैकी १७% आहे. एवढेच नाही तर देशाच्या सकल उत्पादनात त्याचा वाटा ४% असून त्यात ३.५ कोटी लोक काम करतात. तरीही चीनी वस्त्रौद्योगांपुढे आपला वस्त्रोद्योग अगदीच नगण्य आहे. देशातील वस्त्रोद्योग चीनप्रमाणे प्रगती का करू शकत नाही हे पुढील मुद्द्यांवरून स्पष्ट होईल :

- ६५% चरखे जुनाट आहेत.
- केवळ ५.८ माग अत्याधुनिक आहेत (अमेरिकेत हेच प्रमाण ८०% तर आपला शेजारी पाकीस्तानात ते ६२% आहे!)
- कापड विणणाऱ्या एका कारखान्यात सरासरी ११९ माग आहेत (हाँगकाँग मध्ये ६९८ तर चीनमध्ये ६०५ आहेत!)
- आपल्या देशातील मागाची सरासरी किंमत १५ लाख रुपये आहे तर हाँगकाँगमध्ये हिच सरासरी किंमत १२ कोटीपेक्षा जास्त आहे! यावरून तेथील माग केवढे आधुनिक आहेत हे लक्षात येते.
- आपल्या देशात एक मजुर सरासरी ९ शर्ट बनवतो तर हाँगकाँगमधील कामगार २१ शर्ट बनवतो!
- आपली उत्पादकता अमेरिकेच्या केवळ १६% आहे!
- आपला वाहतूक खर्च चीनपेक्षा ३७% जास्त आहे. याचे मुख्य कारण बंदरांवर माल भरण्यास लागणारा वेळ आणि परवाने देताना सरकारी यंत्रणेकडून होणारा भ्रष्टाचार!

एवढेच नाही तर सरकारी धोरणे कापड उद्योगाच्या मुळावर उठणारी आहेत. देशात उद्योग सुरू करताना इतर उद्योगांना ज्या अडचणी येतात जसे आवश्यक 'परवाने' मिळवण्यासाठी होणारा त्रास आणि त्यातून होणारा भ्रष्टाचार, वाया जाणारा वेळ, जास्त व्याजाने मिळणारे कर्ज, महाग वीज, मजुरांविषयी असलेले जाचक कायदे, सरकारी यंत्रणेकडून होणारा त्रास इत्यादी अडचणी वस्त्रोद्योगाला आहेतच त्याचबरोबर सरकारच्या काही चुकीच्या धोरणांमुळे या क्षेत्राचा विकास खुंटला आहे. कसा ते पुढे पाहू...

**हँक यार्न ऑब्लिगेशन**

याला सोप्या मराठीत सुत गिरण्यांवर सरकारने केलेला बलात्कार असेच म्हणावे लागेल. देशातील सुतगिरण्यांनी आपल्या एकूण उत्पादनांपैकी ५०% उत्पादन हे हलक्या प्रतीच्या जाड्या भरड्या धाग्याचे करावे जो धागा हातमागांना लागतो. या धोरणांमुळे हातमाग चालवणाऱ्यांना कच्चा माल मिळण्याची सोय झाली; पण सुत गिरण्यांची कार्यक्षमता घटली त्यामुळे नफ्याचे प्रमाण घटले त्याचे काय? हातमागांचा एवढा कळावळा जर सरकारला असेल तर सरकारनेच त्यासाठी लागणारे सूत तयार करावे! पण सरकारी सुत गिरण्या केंव्हाच बंद पडल्यात! आणि म्हणून जो सुत उद्योग वेगाने प्रगती करू शकतो त्याच्या पायात ही 'हँक यार्न ऑब्लिगेशन'ची बेडी घालून त्याला कायमचे पंगू करून टाकले आहे आणि त्यामुळेच या क्षेत्रात नव्याने गुंतवणूक करण्यास कोणी तयार होत नाही एवढेच काय तर आपल्या सुत गिरणीचे आधुनिकीकरण कशाच्या जोरावर करावे असा प्रश्न सुतगिरणी मालकांना पडतो. त्यामुळे सुतगिरण्यांचा विकास खुंटला आहे. तसे पाहिले तर या 'बलात्कारातून' १००% मालाची निर्यात करणाऱ्या विंमा सुतापासून कापडापर्यंत सर्वकाही करणाऱ्या गिरण्यांना वगळण्यात आले आहे; पण सरकारच्या 'कृपेने' निर्यात करण्याच्या मार्गात अनंत अडचणी आहेत तसेच कापड उद्योगात लघुउद्योगांना सरकारने ज्या सवलती दिल्या आहेत त्यामुळे मोठ्या गिरण्यांना पुरेसा नफा कमावता येत नाही. म्हणून सरकारने दिलेली सूट परिणामकारक ठरत नाही.

**लघुउद्योगांना सवलत-आरक्षण**

कपडे शिवण्याच्या उद्योगास सरकारचे संरक्षण लाभले आहे. हे क्षेत्र लघु उद्योगांसाठी राखून ठेवण्यात आले आहे. त्यामुळे चीनमधे जेव्हा सगळ्यात लहान कारखान्यांत निदान ५०० यंत्रे असतात आपल्याकडच्या 'मोठ्यात-मोठ्या' कारखान्यात केवळ २०! जे कारखाने आपला माल पूर्णपणे निर्यात करणार आहेत अशा कारखान्यांना लघुउद्योगांचे हे आरक्षण लागू नाही; पण

कापसाच्या गाठीपासून सुत आणि सुताचे कापड आणि त्यावर प्रक्रिया करणाऱ्या गिरण्यांना कंपोझिट मिल म्हणतात. भारतात अशा मिलचे प्रमाण केवळ २% आहे; पण त्या ४% कापडाचे उत्पादन करतात! इतर ९८% गिरण्या केवळ ९६% कापडाचे उत्पादन करतात. सगळ्या गिरण्या आधुनिक झाल्या तर कापड उत्पादन दुपटीने वाढू शकते. मोठ्या कारखान्यात मोठी गुंतवणूक करून जास्त कार्यक्षमतेने उत्पादन घेता येते. त्यामुळे एकूणच निर्यात क्षमता वाढून जास्त मोठा व्यवसाय करत येतो. तसे झाल्यास कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या आणि या व्यवसायात गुंतलेल्या सर्वांनाच त्याचा फायदा होऊ शकतो. कापड उद्योगांबाबत सरकारने आपल्या धोरणात आंतरराष्ट्रीय बाजारपेठ काबीज करण्याच्या दृष्टीने सुसंगत बदल केले तर काही लघु उद्योजकांना कदाचित आपले उद्योग बंद करावे लागतील. कदाचित त्यांना मोठ्या उद्योगांत नोकरी मिळेल किंवा ते मोठ्या कारखान्यांसाठी ‘सबकॉंट्रॅक्टर’ म्हणूनही काम करू शकतील. त्यांच्या पुढे ‘जीवन-मरणाचा प्रश्न उभा राहणार नाही हे नक्की; पण आज सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील लाखो कापूस उत्पादक शेतकयांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. त्या तुलनेत सरकारने जुनाट, अकार्यक्षम गिरण्यांना आणि लघु उद्योगाला संरक्षण देण्याचे थांबविल्या कारणाने होणारे नुकसान सौम्यच म्हणावे लागेल.

देशातील एकूणच औद्योगिक धोरण पुरेसे आकर्षक नसल्यामुळे भारतात येऊन कपडे शिवण्यापेक्षा ते चीन, हॉंगकॉंग, इंडोनेशिया इत्यादी देशांतून शिवून घेणे फायद्याचे ठरते. त्यामुळे केवळ हलक्या दर्जाचे, कमी नफा मिळणारे कपडे भारतातून निर्यात होतात. उच्च दर्जाचे-जास्त फायदा देणारे कपडे शिवायला इतर देश आहेत ना!

कपडे शिवण्याच्या बाबतीत जसे आपल्या देशाचे धोरण चुकले तीच चूक कापडावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाच्या बाबतीत सरकारने केली आहे. कापड प्रक्रिया उद्योग हा लघु उद्योग असल्यामुळे त्याची कार्यक्षमता कमी आहे. तसेच त्यातील गुंतवणूक कमी आहे म्हणून मालाचा दर्जाही हलका आहे. लघु उद्योगाला दिलेल्या या आरक्षणामुळे देशातील कापड उद्योगाचे नुकसानच झालेले आहे.

आणि या कारणांमुळेच चीनला भारताकडून कापसाच्या गाठी आयात करून त्याचे सूत, सुताचे कापड आणि कापडाचे कपडे शिवून विकणे फायद्याचे ठरते. एवढेच नाही तर कच्च्या मालाची आयात करून त्यावर प्रक्रिया करून त्याची किंमत कित्येक पट वाढवून एखादा उद्योग देशाच्या आर्थिक विकासात कसा हातभार लावू शकतो याचे उत्तम उदाहरण जगापुढे ठेवण्यात चीनने या मिळाविले आहे आणि ते प्रशंसनीय आहे.

वरील चर्चेतून हे स्पष्ट होण्यास मदत होईल की कशाप्रकारे चुकीच्या सरकारी धोरणांमुळे देशातील कापड उद्योगाची प्रगती खुंटली आहे. आता कापसाच्या व्यापारावर परिणाम करणाऱ्या इतर घटकांचा विचार करू.

**ड्रॅगनची चाल**

चीनचे धोरण नेहमी दुरगामी परिणाम करणारे असते. जगातील कापसाच्या बाजारात चीन हा सर्वांत मोठा खरेतर जवळ-जवळ एकमेव! खरेदीदार आहे. म्हणून तो बाजाराला हवे तसे नाचवू शकतो. गेल्या वर्षी चीनने आपल्या देशातील कापूस साठवून ठेवला आणि आंतरराष्ट्रीय बाजारातून मोठ्या प्रमाणात तो खरेदी केला. याचा परिणाम भाव वाढण्यात झाला. कापसाचे वाढणारे भाव पाहून शेतकऱ्यापासून ते व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांनाच ‘हाव’ सुटली आणि सर्वांनीच कापूस साठवायला सुरुवात केली. एप्रिल २०११ मध्ये जेव्हा भारतातून सुताची-गाठींची निर्यात व्हायला सुरुवात झाली तेव्हा चीनने कापसाचे भाव ‘पाडले’. एवढेच काय तर २०११-२०१२ च्या हंगामासाठी आपली सर्व खरेदी अमेरिकेकडून करण्याचे करार करून टाकले. भारत सरकार आणि आपला शेतकरी चीनी ड्रॅगनच्या चालीला बळी पडलाच. देशात या वर्षी कापसाचा पेरा वाढला. उत्पादनही वाढले; पण बाजारात मंदी असल्यामुळे भाव पडले. चीनने तर आपली खरेदी आधीच करून ठेवलेली! याचा वाईट परिणाम देशातल्या कापूस उद्योगावर झाला. आजच्या घडीला बऱ्याच गिरण्या बंद आहेत. कापसाची मागणी घटली आहे. जो काही कापूस निर्यात झाला त्यामुळे बाजारात थोडी तेजी होती. नसता सगळीकडी मंदीचेच वारे वाहत होते. चीनला नेमके हेच हवे आहे. भारतातल्या कापूस उद्योगाचा कणा एकदा मोडला की जगातल्या कापड उद्योगावर चीनची अनिर्बंध सत्ता सुरू होईल. हीच ड्रॅगनची चाल आहे!

**चीनच्या प्रयत्नांना वाणिज्य मंत्रालयाची साथ!**

देशातल्या कापूस उद्योगाचा कणा मोडण्यात चीनला कसा रस आहे हे आपण वर पाहिले. त्याच चीनला आपल्या वाणिज्य मंत्रालयाने कशी साथ दिली ते पाहू. देशातून ८४ लाख कापसाच्या गाठींची निर्यात होऊ शकते असा सरकारचा अंदाज होता. प्रत्यक्षात ९५ लाख गाठींची निर्यात झाली असून २५-३० लाख गाठींच्या निर्यातीचे करार झालेले आहेत. म्हणून वाणिज्य मंत्रालयाने ५ मार्च रोजी अचानक गाठींच्या निर्यातीवर बंदी घातली. बंदीचे समर्थन करण्यासाठी दिलेले कारण काय तर म्हणे जास्त गाठींची निर्यात झाल्यास देशातील कापड उद्योगास कच्चा माल कमी पडेल. भारतातल्या शेतकऱ्याचा माल वगळता इतर कोणात्याही प्रकारच्या मालाच्या निर्यातीवर सरकार बंदी घालत नाही; पण देशातल्या आजारी,



कमजोर, अकार्यक्षम अशा कापड उद्योगांसाठी मात्र तातडीने कापसाच्या निर्यातीवर बंदी घालून आधीच हलाखीच्या परिस्थितीमध्ये कसेबसे दिवस काढणाऱ्या शेतकऱ्याचा पुरता नायनाट व्हावा असा निर्णय घेते! केवढा घोर हा अन्याय. (यापेक्षा मोठे दुर्दैव म्हणजे असला भकार-टुकार तथा शेतकरी विरोधी निर्णय घेणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षाला जिल्हापरिषदेची सत्ता हाच शेतकरी देतो!) पण त्या बंदीचा सर्वांनीच विरोध केल्यामुळे सरकारला ती मागे घ्यावी लागली. या बंदी मागे काही काळेबेरे आहे हे नक्की. कारण देशातल्या अनेक निर्यातदारांनी आपल्याच परदेशातील उप-कंपनीला गाठी विकल्याचा संशय आहे. ज्या दिवशी आपण निर्यातीवर बंदी घातली त्याच दिवशी आंतरराष्ट्रीय बाजारात गाठींचे भाव साधारण रुपये ६०० ने वाढले. म्हणजे १० लाख गाठींमागे रुपये ६० कोटी! एक बंदी लावणे आणि ती पुन्हा उठवणे यातून केवढा मोठा घोटाळा होऊ शकतो याची ही एक झलक आहे. हे असे होणार हे गृहीत धरून कोणी जर गाठी साठवून ठेवल्या असतील तर थोड्या काळात केवढा मोठा नफा कमवता येऊ शकतो याचे हे एक उदाहरण आहे.

**सरकारी हस्तक्षेप**

वरकरणी पाहता सरकारची कापड नीती आणि कापसाची निर्यातबंदी या गोष्टी भिन्न आहेत; पण दोन्हीमध्ये एक समान धागा आहे तो म्हणजे कापूस उत्पादक शेतकरी. दोन्ही क्षेत्रात सरकारने केलेल्या हस्तक्षेपांमुळे, सरकारी धोरणांमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्याचे अपरिमित नुकसान झालेले आहे म्हणून या भिन्न बाबींचा आपल्याला एकत्रित विचार करावा लागणार आहे.

देशातील कापड उद्योग अंदाजे ६० लाख लोकांना रोजगार देतो. तर सकल उत्पादनात तो ३% ची भर टाकतो. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे हा उद्योग आंतरराष्ट्रीय बाजारात, तेथील स्पर्धेत अग्रेसरच काय, पण दुसऱ्या-तिसऱ्या स्थानावरही राहू शकत नाही ही खरी शोकांतिका आहे. कापड उद्योगावर २ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. अशा कर्जबाजारी अकार्यक्षम उद्योगाला केलेली मदत म्हणजे फुटक्या भांड्यात पाणी ओतणे होय. या उलट कापसाची कहाणी आहे. २००२-२००३ मध्ये बीटी बियाणे उपलब्ध झाल्यापासून कापूस उत्पादनात भरघोस वाढ झालेली आहे. सरकारने दिलेले अनुदान चुकीच्या 'जागी' पोहोचत असले तरीही, सरकारची व्यापारावरील नियंत्रणे जाचक असली तरीही, खऱ्या अर्थाने सरकार उत्पादन वाढीसाठी कोणतेही प्रोत्साहन देत नसले तरीही देशातल्या शेतकऱ्यांनी आपल्या हिंमतीवर कापसाच्या उत्पादनात आघाडी घेतलेली आहे. देशातले अंदाजे ४५ लाख शेतकरी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले इतर, ज्यात शेतमजुर वगैरे आले असे ५-६ कोटी लोक यांचे जीवन कापसाच्या शेतीशी निगडीत आहे. मग वस्त्रोद्योगात गुंतलेल्या अंदाजे ६० लाख लोक आणि त्यांचे कुटुंबीय म्हणजे अंदाजे १.५ कोटी लोकांसाठी या ५-६ कोटी शेतकऱ्यांचा बळी देणे योग्य आहे काय? कापड उद्योगाच्या कल्याणासाठी शेतकऱ्याच्या विभूती देणे हा अन्याय आहे.

**शेतकरी-वस्त्रोद्योग यांचा संबंध**

खरेतर कापसाच्या उत्पादनापासून त्याचे तयार कपडे बनविण्यापर्यंतचा उद्योग म्हणजे एक साखळी आहे. अंदाजे ३५-४० रुपये किलो असा कापसाचा भाव असताना रुईचा भाव रुपये १०० प्रति किलो असा असतो. तर सुताचा भाव रुपये २०० पेक्षा जास्त आणि तयार कपड्याचा भाव पाहिला तर कदाचत रुपये १०००-१५०० प्रति किलो! यातली प्रत्येक कडी महत्त्वाची आहे, कारण प्रत्येक कडी प्रचंड मूल्यवृद्धी करते आहे आणि सगळ्यांत कमजोर कडीवरच साखळीची ताकद अवलंबून आहे. आपण वर बघीतल्याप्रमाणे सुताचे उत्पादन, कापड निर्मिती प्रक्रिया आणि कपडे शिवणे या तिन्ही कड्या नाजूक-कमजोर आहेत आणि त्या कड्या कमजोर ठेवत सरकारने सर्वांत मजबूत असलेल्या कडीला म्हणजे कापूस उत्पादक शेतकऱ्यास वेठीस धरले आहे. त्यामुळे एकूण साखळीची ताकद कमी झाली आहे. सरकारने आपली धोरणे बदलून या कमजोर कड्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेत टिकाव धरता येईल आणि अग्रेसर राहता येईल हे बघावे. त्यासाठी काही फार मोठी उलथापालथ करण्याची गरज नाही. अगदी सोपे उपाय जसे हँक यार्न ऑब्लिगेशन काढून टाकणे, अकार्यक्षम कापड उद्योगास दिलेल्या सवलती बंद करणे, तयार कपडे बनविण्यासाठी असलेले लघुउद्योगाचे आरक्षण काढून टाकणे, करप्रणाली सुटसुटीत करणे, निर्यात परवाने तसेच निर्यातीचे काम सोपे स्वस्त तसेच कार्यक्षमतेने करणे, उद्योगांना वीज-कर्ज माफक दरात पुरविणे इत्यादी उपाय केल्यास आपल्या देशातला वस्त्रोद्योग जागतिक स्पर्धेत सर्वांत पुढे राहू शकतो. तसे झाल्यास देशातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्याचे नष्टचर्य तर संपेलच, एवढेच नाही तर देशातील कापड उद्योग मोठा फायदेशीर होईल. कापसाच्या एकूण व्यवसायात देशातल्या अंदाजे १०% जनतेचे हित गुंतलेले आहे. त्यांच्या भविष्याचा विचार सरकारने करायलाच हवा. नसता हे दुर्लक्ष फार महागात पडेल हे लक्षात ठेवावे..

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१
मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# निर्यातबंदी ‘उठली-बसली’चा दरबारी खेळ

दरवर्षी योग्य दराने आणि उत्तम प्रतीचा माल पुरवू शकेल, अशा प्रकारचा एक विश्वासू देश म्हणून भारताची प्रतिमा जागतिक बाजारपेठेत कधीच उभी राहू दिली जात नाही आणि याचे गुन्हेगार हे इकडे टोलवाटोलवीची उत्तरे देत असतात. हे केवळ कापसाच्या बाबतीतच होते असे नाही. साखर, कांदा, द्राक्षे या सर्वच पिकांच्याबाबतीत आपली बाजारपेठेतील विश्वासार्हता देश गमावून बसला आहे. नव्हे, आम्ही व्यापाराच्या दृष्टीने किती नालायक आहोत, हे वारंवार आम्ही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सिद्ध करीत असतो. अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा आणि देशांतर्गत बाजारपेठेचा योग्य संगम घालून आपली पत जगात वाढवण्याऐवजी आपलेच निर्णय केव्हातरी घाईघाईने घ्यायचे. ते पुन्हा फिरवायचे. त्याचं चुकीचं समर्थन करायचं आणि जमलंच तर त्याचा राजकीय फायदाही उठवायचा हेच सध्या चालू आहे.



**ज्ञानेश्वर शेलार**

दरवर्षी कापसावरील निर्यातबंदी ही ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये लावली जाते. मागील वर्षी जागतिक स्तरावर झालेले कापसाचे कमी उत्पादन व त्याचवेळी भारतामध्ये चांगला पाऊस आणि बी.टी. कॉटन यांमुळे आलेले भरघोस उत्पादन याचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला. ७ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. अशा कापसाच्या उत्तम हंगामात निर्यातबंदीचा खोडा बसू नये, यासाठी शेतकरी संघटनेने सप्टेंबरमध्येच नागपूर, औरंगाबाद, जळगाव या ठिकाणी आयुक्त कार्यालयांसमोर एका दिवसाचे लाक्षणीक धरणे धरून आंदोलन केले. मी त्यावेळी लिहिलेल्या ‘आंदोलन नीती’ या लेखात शेतकरी संघटनेने संभाव्य निर्यातबंदीवर आपल्या आंदोलनाने कशा पद्धतीने अगोदरच मात केली व निर्यातबंदी न लागल्याने शेतकऱ्यांना कसा फायदा होईल हे लिहिले. यावर्षी जागतिक स्तरावर झालेले कापसाचे भरघोस उत्पादन आणि भारतात मात्र कमी पावसामुळे झालेले मागील वर्षीपेक्षा अर्धेच उत्पादन याचा फटका शेतकऱ्यांना बसला. कापूस निर्यात करणे शक्य नव्हते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भरघोस उत्पादनामुळे कोणीही गिऱ्हाईक नव्हते. भावही अर्ध्यावर आले. मागील वर्षी मिळालेल्या ७ हजार रुपये भावाच्या तुलनेत या वर्षी कसेबसे साडेतीन ते चार हजार रुपये क्विंटल हा कापसाच भाव राहिला. शेतकऱ्यांना भाववाढीची अपेक्षा असल्याने आणि मागील वर्षी बरा भाव मिळाल्याने त्यांच्यात आलेली थोडी आर्थिक ताकद या दोन्हीही आपला कापूस घरात साठवून ठेवण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांनी केला. भाव मात्र फारसे वाढले नाहीत. शेतकऱ्यांना बाजारात कापूस न्यावा लागला.

दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निर्यातबंदी लागते. यावर्षी कमी भावामुळे असे काही करण्याची सरकारला गरज पडली नाही. सरकार शहाणे झाले, सुधारले, शेतकऱ्यांचे प्रश्न त्याला कळू लागले, जाणत्या राजालाही कदाचित त्याची जाणीव झाली असावी, असे विचार शेतकऱ्यांच्या मनात आलेले असतानाच अचानक ५ मार्चला निर्यातबंदी लावल्याचा फतवा दिल्ली दरबारातून निघाला. दरवर्षी एखादा सण-उत्सव साजरा करावा तशी दिवाळीच्या आसपास निर्यातबंद लावली जाते. यावर्षी ती लावली गेली नाही. सरकारी दप्तरात कुठेतरी वस्त्रोद्योग किंवा वाणिज्य मंत्रालयातील बाबूला याबद्दल आपल्या फायली चाळताना एखादा कागद सापडला असावा. यावर्षी तर कापसावर निर्यातबंदी लावायचे राहून गेले. दरवर्षी आपण हे करतो; पण चला उशिरा का होईना निर्यातबंदी लावून टाकू अशा विचारांनी कुणीतरी सेक्रेटरी लेव्हलच्या कारकूनाने निर्यातबंदीचा फतवा काढला असावा. हा फतवा निघाल्याबरोबर सगळीकडे हाहाकार उडाला. विशेषतः दरवर्षी निर्यातबंदी लावताना कृषीमंत्रालय, वस्त्रोद्योग मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालय हे तिघे मिळून शेतकऱ्यांच्या कापसाचा भाव पाडण्यासाठी ही करवत चालवतात. जाणता राजा म्हणणाऱ्यांना यावर्षी दोघांनी अंधारात ठेवले. निर्यातबंदीच्या निर्णयाची खबर त्यांना वर्तमानपत्रातूनच कळाली. त्यामुळे ते एकदम संतप्त झाले आणि यावर संतप्त प्रतिक्रिया त्यांनी पंतप्रधानांकडे केली. कृषी मंत्र्यांना हल्ली दिल्ली दरबारी काय किंमत आहे हेही या निमित्ताने दिसून आले. निर्यातबंदी तर लागलेली आणि आपल्याला विचारात घेतलेले नाही, अशावेळी कुशल राजकारणी आपल्या नाकर्तेपणाचाही कसा फायदा उठवतात हे यावेळी दिसून आले. कृषिमंत्र्यांनी तात्काळ नाराजी व्यक्त केली. त्यांना देशातील प्रथम क्रमांकाच्या कापूस उत्पादक गुजरात राज्याचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनीही साथ दिली. १२ तारखेला निर्यातबंदी उठवली त्यावेळी या दोघांच्या प्रयत्नांमुळे आणि त्यांचा रोष विशेषतः कृषिमंत्र्यांचा- ते युपीएचे घटक असल्यामुळे दिल्ली दरबाराला परवडणारा नाही, म्हणून कापूस निर्यातबंदी उठवली आहे, असा प्रचार सुरू झाला. निर्यातबंदी बसवली, निर्यातबंदी उठवली या दिल्ली दरबारातील खेळाचा एक डाव पूर्ण झाला. त्याचे श्रेयही लाटून झाले.

शरद जोशींनी यावेळी नागपूर येथे वस्त्रोद्योग कारखानदारांच्या दबावामुळे ही निर्यातबंदी लावण्यात आली होती, असा आरोप केला होता. कृषिमंत्र्यांनी तात्काळ या आरोपाचे खंडन करून हे केवळ पोरकट विधान आहे, असे म्हटले. या बरोबरच वस्त्रोद्योगाच्या दबावामुळे निर्यातबंदी लावण्यात आलेली नाही, याउलट वस्त्रोद्योगाचाही निर्यातबंदीस विरोधच आहे आणि त्यांनी अगोदरच अशा प्रकारचे पत्र सरकारला दिलेले आहे, असा खुलासाही केला. कृषिमंत्र्यांना हे सर्व माहीत होते. पत्राविषयीही ते जाणून होते. फक्त त्यांना शेतकऱ्यांच्या संबंधाने होणारा निर्यातबंदी लावण्याच्या एवढ्या महत्त्वाच्या निर्णयाबद्दल मात्र अजिबात खबर नव्हती. आणि त्यांनीच पुन्हा वस्त्रोद्योगांनी दबाव टाकलेला आहे, हे पोरकटपणाचे विधान असल्याचे म्हटले. दिल्लीत राहून एवढ्या महत्त्वाच्या निर्णयाविषयी कानावर हात ठेवणे हा काही छोटा पोरकटपणा आहे का? हा तर आणखीन कोणता कोणता ‘पणा’ म्हणावे!

याचवेळी भाजपने जळगावमध्ये मोर्चा काढला. तसेच त्यांचेच एक आमदार यांनी लातूरात निर्यातबंदी लावणे कसे चुकीचे आहे यासाठी लातूरात पत्रकार परिषद घेतली. पत्रकार परिषदेत त्यांनी ३०% कापूस शेतकऱ्यांच्या घरात शिल्लक असताना कापसावर निर्यातबंदी लावली आणि कृषिमंत्री व पंतप्रधानांना याची खबरबात नाही, तर मग सरकार चालवतो कोण? असा सवाल केला. उघडच आहे, सरकार काही मंत्री आणि प्रधानमंत्री चालवत

नाहीत, बाबू लोकच चालवतात. त्यांनी ३०% कापूस शेतकऱ्यांच्या घरात साठवलेला आहे, हेच तर खरे निर्यातबंदीचे कारण आहे, हे जाणून घ्यायला हवे. शेतकऱ्यांच्या घरात किंवा शेतात जेव्हा कापूस आहे, तेव्हाच तर निर्यातबंदी लावली जाते. व्यापाऱ्यांना आणि कारखानदारांना त्याचाच फायदा होतो. निर्यातबंदी लागणार किंवा लागली असे कळताक्षणी कापसाचे भाव हजार, दोन हजारांनी गडगडतात हे पाशा पटेलांनाही माहीत आहे. याच वेळी लातुरात कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष अशोक गुलाटी हेही हजर होते. शेतीमालाला उत्पादन खर्चावर भाव मिळावा याची पाहणी करण्यासाठी व त्यावर उपाय योजना करण्यासाठी ही समिती सध्या महाराष्ट्रात फिरत आहे. खरे तर शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळावा यावर आणखीन किती कमिट्या आणि समित्या नेमल्या जाणार आहेत आणि चर्चा करणार आहेत, हा काही चर्चा करण्याचा विषय नाही! शेतकऱ्यांना भाव कसा मिळेल यासाठी उपाययोजना हाच सगळ्यांत महत्त्वाचा मुद्दा आहे. शेतकरी संघटनेने तर अगदी सुरुवातीपासूनच कृषिमूल्य आयोग कशा पद्धतीने शेतीमालाच्या किमती कमी आकारून किंवा शेतीच्या आदानांच्या किमती या नगण्य धरून शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते हे वारंवार निदर्शनास आणून दिले आहे. कृषिमूल्य आयोग हाच उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळण्यातील मोठा अडसर ठरला आहे. नियोजन मंडळ आणि कृषिमूल्य आयोग ज्या दिवशी बरखास्त होतील, तो या देशातील शेतकऱ्यांचा स्वातंत्र्य दिन असेल. नसता केव्हाही उठावे आणि निर्यातबंदी लावावी, असा अजागळपणा नियोजन मंडळ किंवा कृषिमूल्य आयोग यांच्याशिवाय होऊच शकत नाही.

शेवटी शेतकरी संघटनेच्या रेट्याने आणि आपली चूक लक्षात आल्याने ११ मार्चला निर्यातबंदी उठवण्यात आली. अधिकृत घोषणा मात्र अद्याप झालेली नाही. निर्यातबंदी बसवताना देशातून तीस लाख गाठींची निर्यात झाली आहे, यापुढेही निर्यात चालू राहिली, तर देशात कापसाचा तुटवडा निर्माण होईल किंवा प्रचंड भाववाढ होईल, असे सांगण्यात आले. पूर्ण हंगामात चार हजार रुपयांपेक्षा जास्त भाव यावर्षी कापसाला मिळालेला नाही. तरीही असे बाष्कळ कारण देऊन निर्यातबंदी लावण्यात आली. निर्यातबंदी उठवताना तर, वाणिज्य मंत्री आनंद शर्मा यांनी सद्यस्थिती 'शेतकरी, व्यापारी आणि उद्योगक्षेत्राचे हित लक्षात घेऊन मंत्रिगटाने निर्यातबंदी मागे घेण्याचा विचार केला आहे,' असे सांगितले. ही निर्यातबंदी लावताना जर व्यापाऱ्यांचेही हीत नव्हते, उद्योगांचेही हीत नव्हते, शेतकऱ्यांचा असण्याचा तर प्रश्नच नाही, तर मग कुणाच्या हितासाठी निर्यातबंदी लावण्यात आली, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. निर्यातबंद लावतानाही आणि उठवतानाही कशा पद्धतीने बाष्कळ, निरर्थक कारणे अगदी केंद्रीय मंत्रीसुद्धा देतात, हे यावेळी दिसून आले.

निर्यातबंदीचा निर्णय घेताना दरवर्षीच कृषिमंत्रालय, वस्त्रोद्योग मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालय हे अचानक निर्यातबंदी लावून कोणी लावली हे आम्हाला काही ठावूक नाही, कृषिमंत्रालय म्हणते - ही बहुधा वस्त्रोद्योग मंत्रालयाने लावली असेल, वस्त्रोद्योग मंत्रालय म्हणते- वाणिज मंत्रालयाने लावली असेल, वाणिज्य मंत्रालय म्हणते- ही बहुधा कृषि किंवा वस्त्रोद्योग मंत्रालयाने लावली असेल- असा लपाछपीचा खेळ खेळतात. हा खेळ साधारणपणे महिना, दीडमहिना चालतो. मग कुणीतरी मंत्री गटाकडे निर्यातबंदी उठवण्या संबंधीचा निर्णय घेण्याचे सोपवले आहे, असे सांगतो. आणि या खेळात आणखी एक चौथा भिडू येऊन खेळू लागतो. शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्यांना नेमके कोण निर्णय घेते आणि त्याच्याविषयी शिफारसी कोण करते याचा कधीच थांगपत्ता लागत नाही. अशा लपाछपीमध्ये हंगाम निघून जातो, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपण वेळच्या वेळी आपला माल पुरवणे किंवा त्यासाठीची बांधिलकी पाळणे हे तर लांबच राहो, आपणच इकडे एकमेकांवर निर्णय टोलवित राहातो. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपली नामुष्की होते. दरवर्षी योग्य दराने आणि उत्तम प्रतीचा माल पुरवू शकेल, अशा प्रकारचा एक विश्वासू देश म्हणून भारताची प्रतिमा जागतिक बाजारपेठेत कधीच उभी राहू दिली जात नाही आणि याचे गुन्हेगार हे इकडे टोलवाटोलवीची उत्तरे देत असतात. हे केवळ कापसाच्या बाबतीतच होते असे नाही. साखर, कांदा, द्राक्षे या सर्वच पिकांच्याबाबतीत आपली बाजारपेठेतील विश्वासार्हता देश गमावून बसला आहे. नव्हे, आम्ही व्यापाराच्या दृष्टीने किती नालायक आहोत, हे वारंवार आम्ही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सिद्ध करीत असतो. अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा आणि देशांतर्गत बाजारपेठेचा योग्य संगम घालून आपली पत जगात वाढवण्याऐवजी आपलेच निर्णय केव्हातरी घाईघाईने घ्यायचे. ते पुन्हा फिरवायचे. त्याचं चुकीचं समर्थन करायचं आणि जमलंच तर त्याचा राजकीय फायदाही उठवायचा हेच सध्या चालू आहे.

नुकत्याच जिल्हा परिषद, पंचायत समिती व दहा महानगर पालिकांच्या निवडणुका होऊन गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या बाबतीत नेहमी असे म्हटले जाते की, घरात कुणाचा मृत्यू झाला असेल, तरीही शेतकरी काळजावर दगड ठेवून आपले अश्रू पुसून बाहेर पडतो आणि शेतात चाड्यावर मूठ ठेवतो. हंगाम आला की, सगळी सुखदुःखे विसरून त्याला आपल्या कामाचे इतिकर्तव्य पार पाडावेच लागते. आपली पोशिंद्याची भूमिका तो कधीच विसरत नाही. जगाला खाऊ घालणाऱ्या बळीराजाला आपली दुःखे उरात दाबून हे करावेच लागते. नसता जग उपाशी मरेल याची त्याला जाणीव असते. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांनी आपले काही भले होईल, या अपेक्षेने कापसाचा भाव पडलेला असताना कापूस घरात दाबून ठेवून, निवडणुकीच्या प्रचारात उडी घेतली. पुढाऱ्यांच्या पाठीमागे प्रचारासाठी रात्रंदिवस खर्ची घातले, कारण यातील पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका या पूर्णपणे शेतीशी आणि ग्रामीण भागाशी निगडीत होत्या. आपल्या घरात साठवलेल्या कापसाची आठवण त्यांना कदाचित निवडणूक प्रचारावेळी आणि पुढाऱ्यांमागे फिरताना आली नसेल. आता मात्र हे झाकलेले मढे त्यांच्यासमोर उभे आहे. त्यात भरीत भर म्हणून निर्यातबंदीही लावण्यात आली. शेतकऱ्यांच्या आता तरी लक्षात येईल का? निवडणुका केवळ पुढाऱ्यांबरोबर भारी भारी गाड्यांमध्ये फिरण्यासाठी किंवा ढाब्यांवर चार-आठ दिवस जेवणासाठी नसून अशा वेळी शेतीमालाचे भाव आयातबंदी, निर्यातबंदी ग्रामीण भागातील मूलभूत सोयीसुविधा यांच्याशी निगडीत असतात. शेतकरी हेच विसरून गेल्यामुळे निवडणुकीचा निकाल, लागल्याबरोबर निर्यातबंद लावण्यात आली. सत्ताधाऱ्यांच्या कदाचित लक्षात आले असावे. निवडणुकीच्या अगोदर जर निर्यातबंदी लावली, तर गदारोळ उठेल, मतदानावर परिणाम होईल. निर्यातबंदी निवडणुकीनंतरच लावलेली बरी. त्यांचे हे डावपेच शेतकऱ्यांनीही ओळखायला शिकायला हवे. नसता निवडणुकीनंतर लगेच निर्यातबंदी त्यावर नंतर आलेल्या दबावामुळे लगेच निर्यातबंदी उठवणे आणि उठवल्याचेही श्रेय घेणे असे घडले नसते. शेतकरी अजून अंधारातच चाचपडत आहेत. त्यांनीही आता राजकारण्यांच्या मागे फिरण्यापेक्षा शेतीमालाच्या भावासाठी राजकारण करायला हवं!

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# किरकोळ बाजारात थेट गुंतवणुकीचा उल्लेखही नाही



शरद जोशी

मार्च २०१२ च्या अंदाजपत्रकीय संसद सत्राची सुरुवात परंपरेप्रमाणे राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने झाली. अभिभाषणात राष्ट्रपतींनी सर्वांत जास्त भर दिला तो त्यांच्या सरकारच्या अन्नसुरक्षा विधेयक मंजूर करून घेण्याच्या उद्देशावर. राष्ट्रपतींचे भाषण हे पूर्ण सत्तेसाठी पथप्रदर्शकच असते. त्यामुळे अंदाजपत्रकाच्या भाषणात प्रणवदांनी पुन्हा त्या मुद्यावर भर द्यावा हेही साहजिकच होते. प्रणवदांनी अन्न सुरक्षा विधेयक मंजूर करून घेण्याचा शासनाचा निश्चय असल्याचे सांगितले. त्यामुळे अन्न ही 'लीगल इंटायटलमेंट' होईल, असे आग्रहाने सांगितले, परंतु अन्न सुरक्षा हा घटनात्मक हक्क, म्हणजे मूलभूत हक्क बनेल, असे काही त्यांच्या भाषणातून दिसले नाही.

सध्याच्या परिस्थितीत अन्नसुरक्षा, जर शेतकऱ्यांनी पुरेसे अन्न पिकविले, तरच संभाव्य आहे. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याकरिता प्रणवदांनी काही धरणे, काही कालवे अशा योजनांचा ओझरता उल्लेख केला. काही पायाभूत योजना शेतीकरिता पुरविण्याचीही गोष्ट त्यांनी केली. पण ज्या एका गोष्टीकडे सर्व शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले होते, ती म्हणजे किरकोळ बाजारात परदेशी थेट गुंतवणुकीची परवानगी, तिचा मात्र मुखर्जींनी उल्लेख केला नाही.

परदेशातून थेट गुंतवणूक सुरू झाली म्हणजे सध्या शेती आणि बाजारपेठ यांच्यातील रस्ते सुधारतील, साठवणुकीची व्यवस्था होईल, काही शीतगृहे उपलब्ध होतील. आज शेतीपाशी जगाशी स्पर्धा करू शकणारा भारतीय माल बंदरावर पोहोचेपर्यंत स्पर्धेतून बाहेर पडतो, ही परिस्थिती राहणार नाही हे सर्वांना माहीत आहे. परदेशी थेट गुंतवणुकीची सोय आता किंग फिशरसारख्या विमान कंपन्यांनासुद्धा उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांनाच ती का नाकारण्यात येते, हे शेतकऱ्यांना तरी गूढ आहे.

२००८ सालची या सरकारची कर्जमुक्ती योजना उघडउघडपणे शेतकरी कर्जात का पडतो याची कारणमीमांसा न जाणणाऱ्या कोणीतरी अडाण्याने तयार केली असावी. त्यामुळे विनाकारण लहान शेतकरी व मोठा शेतकरी असे शेतकऱ्यांचे दोन विभाग पाडले गेले. त्यापलिकडे विजेची बिले हा शेतीतील खर्चाचा एक सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. त्या खर्चाबद्दल कर्जमुक्ती योजना अवाक्षरही काढत नाही. परिणामतः शेतकऱ्यांची लाखो रुपयांची वीजबिले थकीत आहेत. शेतकऱ्यांची लाखो रुपयांची वीजबिले थकीत आहेत आणि महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही खुद्द केंद्रीय शेतीमंत्र्यांचे पुतणेच वीज कनेक्शन तोडण्याकरिता सरसावले आहेत.

शेतकऱ्यांची परिस्थिती आज अशी आहे की त्यांना विजेचा पुरवठा मिळत नाही. पेट्रोल, डिझेल यांच्या किमती त्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. या संबंधी जैविक इंधनासंबंधीचे धोरण सुधारून इथेनॉलच्या उत्पादनाला परवानगी द्यावी, असे अनेकांनी सुचविले आहे. पण, त्याकडे अद्याप तरी सरकारने लक्ष दिले नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार योजनेने शेतीवर मोठा आघात केला. खरे म्हणजे या योजनेखाली बेरोजगार म्हणून केवळ अशांची नोंद झाली पाहिजे, की ज्यांना स्थानिक शेतात काम मिळू शकत नाही. या पलीकडे जाऊन खुद्द शरद पवार यांनी सुचविल्याप्रमाणे पेरणी आणि हंगामाच्या काळात ही योजना बंदच ठेवली पाहिजे. प्रत्यक्षात या योजनेमुळे एक आळशीपणाचे वातावरण देशभर पसरले आहे. दोन्ही वेळच्या पोटाचा प्रश्न सुटतो. मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटतो. औषध-पाण्याची व्यवस्था आहे, मग कोणीही काम काय म्हणून करावे? या पलीकडे आणखी एक मोठी आपत्ती आहे. काही डाव्या विचारवंतांच्या आग्रहाला बळी पडून शासन आता जमिनीची कमाल धारणा दोन हेक्टर इतकी कमी करण्याच्या विचारात आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी स्पेशल इकॉनॉमिक झोन किंवा इतर औद्योगिक प्रकल्पासाठी हडप केल्या जात आहेत.

जमीन नाही, पाणी नाही, तंत्रज्ञान नाही, कामाला माणसे नाही. मग, शेती होणार कुठून आणि अन्न सुरक्षा कायद्याकरिता लागणारे धान्य पिकावे तरी कसे? अलीकडे कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. गुलाटी यांनी हा मुद्दा मांडला. शेकऱ्यांना जोपर्यंत किमान पोषण मिळत नाही तोपर्यंत तो जगाला पोसण्यासाठी बाहेर पडेल, ही शक्यता नाही. प्रणवदांना शेतीच्या मूळ प्रश्नांची जाणीव नाही, असे कसे म्हणावे. त्यांना ती असली पाहिजे. परंतु, डॉ. मनमोहन सिंग ज्याप्रमाणे शेतीला फायदा देण्याचा प्रश्न निघाला की पायात शेपूट घालून माघार घेतात, त्याप्रमाणे मुखर्जी आपल्या साहेबांचाच कित्ता गिरवित असावेत. अन्यथा, त्यांच्या अंदाजपत्रकात शेतीला सतावणाऱ्या कोणत्याही एका महत्त्वाच्या प्रश्नाविषयी कोणतीही ठोस उपाययोजना नाही. हे गूढ उलगडावे कसे?

*(दै. लोकसत्ता दि. १७ मार्च २०१२ मधून साभार)*

**शरद जोशी**

sharadjoshi.mah@gmail.com

■■



# खसखशीवर बंदी हीच गुन्हेगारीची जननी

अमर हबीब

अफूचे पीक नसते. खसखस हे पीक. या पिकाचे बोंड आल्यानंतर त्यात चिरा पाडला जातो. त्या चिरातून जो चिकट द्राव बाहेर पडतो, त्यापासून अफू तयार केली जाते. खसखसचा वापर जेवणात होतो. तसेच ते औषधी असल्याचेही सांगितले जाते. खसखस हे पुरातन पीक आहे. इसवी सनपूर्व ४००० वर्षांपासून त्याच्या वापराचे पुरावे सापडतात. हे पीक तीन महिन्यांचे आहे. ते सुपीक, चांगल्या आणि बागायती जमिनीवर पिकविले जाते. भारतात खसखशीचे सर्वाधिक हेक्टरी उत्पादन मिळते. म्यानमार, चीन, अफगाणीस्तान, पाकिस्तान आदी अनेक देशांमध्ये हे पीक घेतले जाते. इंग्लंड आणि फिनलँडमध्ये खसखस लागवडीवर कोणतीही बंदी नाही. मात्र तिचा उपयोग औषधी कारणांसाठीच व्हावा असा कायदा आहे. अमेरिकेत बंदी आहे मात्र कॅनडाचा कायदा बंदी असूनही अमेरिकेपेक्षा काहीसा वेगळा आहे. युनोने १९८४ साली नशिल्या पदार्थांच्या उत्पादनावर बंदी घालण्याचा ठराव केला व १९८७ साली त्याचे आंतरराष्ट्रीय कायद्यात रुपांतर झाले. भारताने १९८६ सालीच याबद्दलचा कायदा केला. सरकारी परवानगी घेऊन मध्यप्रदेश, राजस्थान व उत्तरप्रदेशात खसखशीची लागवड करता येते. महाराष्ट्रात मात्र बंदी आहे.

सिरसाळा आणि शिराळा येथे 'अफूची शेती करताना आढळली' अशा बातम्या आल्या. गुन्हे दाखल झाले, खसखशीचे पीक नष्ट करण्यात आले. शेतकऱ्यांच्या अटकांचे सत्र सुरू आहे. अभय बंग सारख्यांनी 'नैतिक' मुद्दा उपस्थित केला. शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी 'पीक स्वातंत्र्या'चा मुद्दा पुढे करून शेतकऱ्यांच्या पाठीशी राहणार असल्याची घोषणा केली. सरकारच्या वतीने गृहमंत्र्यांनी 'कठोर कारवाई'चे आदेश दिले आहेत.

**नैतिकतेचे अर्थशास्त्र**

अफू व्यसन असून ते माणसाला घातक आहे. ज्यापासून अफूची निर्मिती होते असे पीक घेणे नैतिकदृष्टीने उचित नाही. अभय बंग यांनी असा सूर लावला. हाच सूर त्यांनी ज्वारीपासून दारू निर्मितीच्या धोरणाच्या विरोधातही लावला होता. शेतकऱ्यांच्या पदरात चार पैसे पडण्याची शक्यता निर्माण झाली की नैतिकतेचा मुद्दा उपस्थित करून ते धोरण हाणून पाडण्याचा प्रयत्न केला जातो. समाजातील बुद्धिजीवीवर्गाची हीच भूमिका राहिली आहे. सरकारी निर्बंधांनी नैतिकता टिकविण्याचा हा प्रयत्न निव्वळ हस्यास्पद आहे. मुळात सरकारी निर्बंधांमुळे अनैतिकतेची बजबजपुरी माजते. एकेकाळी सोन्यावर सरकारी निर्बंध होते, त्यातून तस्करी सुरू झाली होती. त्याकाळी सोने-चांदीच्या तस्करांचा हैदोस माजला होता. निर्बंध उठले. तस्करीला स्थान राहिले नाही. आता ड्रग्जवर बंदी आहे. सगळा माफिया त्याच्या व्यापारात गुंतला आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांचे हेच चलन आहे. प्राणघातक हत्यारे विकत घेण्यासाठी या गुन्हेगारांनी ड्रग्जचा वापर केलेला आढळतो. बंदी घातल्याने नैतिकता वाढत नाही. उलट गुन्हेगारांचे फावते. हे बंगासारख्यांना कोण समजावून सांगेल?

**खेड्यातील इंडिया**

ड्रग्जवर बंदी आहे म्हणूनच आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांच्या टोळ्या या धंद्यात पडल्या आहेत. खसखशीच्या शेतीतून अफूची निर्मिती या टोळ्यांना हवी आहे. पैसे मिळतात म्हणून या टोळ्यांसाठी जर कोणी खसखसच्या नावावर अफू पिकवित असेल तर तो कोण आहे हे ओळखले पाहिजे. मुंबईच्या झोपडपट्ट्यांत गरीब लोक राहतात. त्या उठवू नये म्हणून कार्यकर्ते आंदोलन करतात. वरवर पाहिले तर यात काहीच आक्षेपार्ह नाही. परंतु खोलात जाऊन पाहिले तर लक्षात येईल की, हे गोरगरीब लोक कोणातरी दादाने धरलेल्या जागेवर राहतात. झोपडपट्टी वाचविणे म्हणजे त्या दादाची जागा वाचविणे. अशा वेळेस कार्यकर्त्यांची मोठी गोची होते. हीच गोची अफूसाठी खसखस लागवड करणाऱ्यांच्या बाबतीत शेतकरी नेत्यांची झालेली दिसते. अशी शेती करण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांची तोंडे गप्प करावी लागतात, पोलिसांनी नाका-डोळ्यांवर पट्टी बांधून वागावे यासाठी त्यांनाही चिरीमिरी द्यावी लागते. खरे तर राजाश्रय लागतो, दांडगाई लागते. हे कोण करू शकतो? झोपडपट्टीसाठी जागा धरणारे जसे दादा असतात, तसे जे ग्रामीण भागात असतात तेच हे करू शकतात. हे दादा आज विविध पक्षांतील नेते म्हणून मिरवू लागले आहेत हे सांगायची आवश्यकता नाही. शेतकरी संघटनेच्या भाषेत बोलायचे तर खेड्यातही एक इंडिया असतो! खेड्यातील इंडियाचा हा प्रताप आहे. त्यांच्या बहकाव्यात काही शेतकरी आले. त्यांचा विनाकारण बळी जातो आहे.

नीळच्या शेतीसाठी इंग्रजांनी सक्ती केली तेव्हा महात्मा गांधींनी त्याविरुद्ध आंदोलन केले होते. जाहीर भूमिका घेतली होती. आम्ही कायदा भंग करू. त्याची शिक्षा भोगायला आम्ही तयार आहोत. ही सत्याग्रहाची भूमिका अफूसाठी खसखस पिकविणाऱ्यांची होती का? जेव्हा शिवाजी महाराज स्वराज्याची स्थापना करण्यासाठी जीवावर उदार होऊन लढत होते, तेव्हा काही आपलेच लोक बादशाहाच्या हुजरेगीरीत धन्यता मानत होते, जेव्हा शेतकरी आंदोलन करीत होते, लाठ्याकाठ्या खात होते, तुरुंगात जात होते, तेव्हा हे लोक कुठे होते? कोणाचे हात बळकट करण्यात मग्न होते? हे खेड्यातील इंडियन्स! चिरीमिरी देऊन गुपचूप केलेल्या उद्योगाचे समर्थन करता येणार नाही. अर्थात या प्रकरणात केवळ शेतकऱ्यांना टार्गेट करणे चुकीचे आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार शेकडो एकरांवर अफूसाठी खसखसची लागवड केली होती, हे खरे मानले तरी प्रश्न असा पडतो की, हे होत असताना महसूल यंत्रणा काय करीत होती? पोलिस यंत्रणा झोपली होती काय? एवढ्या मोठ्याप्रमाणात लागवड झाली तरी यांना सुगावा कसा लागला नाही. जेव्हा चिरा पाडला जातो आणि द्राव स्त्रावतो तेव्हा शिवारात घमघमाट पसरत असतो. या अधिकाऱ्यांची नाके चोंदली होती का? त्यांना गंध कसा आला नाही? की सगळे ठाऊक होते आणि जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले गेले. याला कोण जबाबदार आहे? सरकारने पहिला बडगा आपल्या नोकरांवर उचलायला हवा होता. दुर्दैवाने आपले कायदेही नोकरांच्या बाजूने आणि शेतकऱ्यांच्या विरोधात आहेत.

जगात सर्व देशांत अफू तयार करणाऱ्या खसखशीवर बंदी नाही. एवढेच नव्हे, भारतातदेखील काही राज्यांत परवानगी घेऊन लागवड करता येते. असे असेल तर महाराष्ट्रात त्यावर बंदी लादणे चुकीचे आहे. कोणाला खसखस घ्यायची असेल तर तुमची बंदी का असावी? खसखशीपासून अफू बनवू नये. यासाठी जगभर निर्बंध आहेत. युनोनेही तसा कायदा केला आहे. तो योग्य की अयोग्य हे नंतर पाहू. जगात त्यावर बंदी असेल तर ती आम्हीही मान्य करू. मात्र तुम्ही अफू तयार कराल म्हणून खसखस पेरायची नाही, हे बंधन मान्य करता येण्यासारखे नाही. खसखशीच्या बोंडाला चिरा पाडला तर ते काही लपून राहत नाही. त्यावेळेस पोलिसांनी हस्तक्षेप केला तर समजून घेता येईल. उसापासून जशी साखर निघते, तशी दारूही निघते. दारू नशेचा पदार्थ आहे. उसापासून दारू निर्माण कराल म्हणून उसाची लगवड करायची नाही, हे म्हणणे जेवढे चूक आहे, तेवढेच खसखशीच्या बाबतीतही म्हणता येईल.

अफूसाठी खसखस पिकविण्याचा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांशी संबंध जोडणे विचित्र आहे. पहिली गोष्ट अशी की, ज्या विदर्भात सर्वाधिक आत्महत्या होत आहेत तेथे कोणी अफूसाठी खसखस पिकविल्याचे आढळले नाही. दुसरी बाब अशी की, आत्महत्याकडे वळलेल्या शेतकऱ्यांमध्ये ना अफूसाठी खसखस लागवड करण्याची क्षमता आहे ना बंदुकी घेऊन नक्षलवादी होण्याची. तो दुबळा झालेला आहे. निराश झालेला आहे. नक्षलवादी होण्यासाठी व बंदी असताना खसखशीची लागवड करण्यासाठी जी धमक लागते, ती त्याच्याकडे राहिलेली नाही म्हणूनच तो आत्महत्येकडे वळला आहे. वर सांगितल्याप्रमाणे त्याच्याकडे प्रशासनाला चूप करण्यासाठी देण्याएवढे पैसे असते वा बंदुका घेऊन लूटमार करण्याची शक्ती असती तर तो आत्महत्याकडे वळलाच नसता.

स्त्रीवादी जसे कझाक स्त्रियांचीही बाजू घेतात, जातीयवादी जसे आपल्या जातीतील गुंडांना पाठीशी घालतात किंवा कामगारांच्या संघटना चुकार कामगारांचा कैवार घेतात तसे खेड्यात राहतात म्हणून सगळ्या ग्रामीणांची बाजू घेतली जात असेल तर त्याचे समर्थन होऊ शकत नाही. खेड्यातदेखील एक इंडिया असतो. तो गुन्हेगारीशी संबंधित आहे. राजकारण हे गुन्हेगारांचे आश्रयस्थान बनले आहे. तो भोळ्या शेतकऱ्यांना बहकावतो, ते बिचारे अडकतात. असेच काहीसे या अफू प्रकरणात झालेले दिसते. गुन्हेगारांवर कडक कारवाईची भाषा करणाऱ्या सरकारने या गुन्हेगारीचे कारण ठरलेल्या आपल्या निर्बंधांचा विचार करायला हवा. सरकारी निर्बंध असले की गुन्हेगारांचे फावते. हेच पुन्हा सिद्ध झाले आहे.

**अमर हबीब**
अंबर, यादव हॉस्पिटल शेजारी,
हाऊसिंग सोसायटी,
अंबाजोगाई- ४३१५१७ जि. बीड
मो. ९४२२९३१९८६
habib.amar@gmail.com

■■

# शेतकऱ्यांची हेटाळणी कधी थांबणार?

बीड व सांगली जिल्ह्यातील अफूची शेती राज्यभर चर्चेचा व चिंतनाचा विषय ठरली. परळी तालुक्यातील सिरसाळा, वंजारवाडी, मोहा, पोहनेर या माजी उपमुख्यमंत्री असलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय कर्मभूमीत तर सध्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या सांगली जिल्ह्यातील शेतकरी अफूची शेती करण्यास का वळले? अर्थातच अफूच्या लागवडीपासून शेतकऱ्यांना एकरी लाखोंच्या आकड्यात उत्पन्न मिळू लागले. परिणामी अधिकाधिक उत्पन्न देणारे पीक म्हणून परिसरातील गावात अफूची लागवड वणव्यागत वाढत गेली. जिल्हा परिषद निवडणूक निकालानंतर अचानक स्फोट व्हावा तसा विविधांगी प्रसार माध्यमांतून अफूच्या शेतीने डोके वर काढले. शेतीशी संबंधित असणाऱ्यांचा, नसणाऱ्यांचा ती चर्चेचा विषय ठरली. पोलिसी यंत्रणा, महसूल खाते, राज्यकर्ते, नार्कोटिक्स विभागाचे अधिकारी चक्रावून गेले. तलाठ्यापासून मंडळाधिकाऱ्यांपर्यंत निलंबनाच्या नोटीसा पाठविल्या गेल्या. अफूंनी भरलेले ऐंशी ट्रक्स, अफू नष्ट कसा करायचा हा प्रश्न पोलिसीयंत्रनेला पडला. पुरावा संपेल या भीतीने अफू नष्ट करण्यास न्यायालयाने नकार दिला. हा सगळा घटनाक्रम विविध प्रसारमाध्यमांतून विस्तृतपणे मांडला गेला. या प्रकरणात सुमारे त्रेपन्न शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले गेले. काही शेतकरी स्वत: होऊन पोलिस ठाण्यात हजर झाले. न्यायलयाने शेतकऱ्यांना आरोपी ठरवून पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. यातून अफूची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा खलनायकी चेहरा समाजमनासमोर रंगविला गेला.

अफूची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे समर्थन करण्याचा हेतू या लेखाचा नसून ऐतखाऊ इंडियन समाज शेतकऱ्यांबाबत संवेदनाहीन, हाल्याच्या कातडीचा कसा होऊ लागला आहे, हे दर्शविण्याचा आहे. शेतकऱ्यांची चहुबाजूंनी कशी उपेक्षा होते आणि शेती आत्मघाताचे साधन कशी बनत चालली आहे हे सांगतानाच शासनकर्त्यांच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निर्देश करावा लागतो. शासनकर्त्यांच्या आयात-निर्यात धोरणाच्या दुटप्पीपणातून शेतकरी देशोधडीला लागला आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला जात नसल्याने शेती दिवसेंदिवस आतबट्ट्याचा व्यवसाय ठरू लागली. कापूस, ऊस, हळद, केळी, द्राक्ष, कांदा अशा कितीतरी पिकांचा उत्पानदखर्च प्रचंड वेगाने वाढत आहे. त्या तुलनेत पदरी पडणाऱ्या उत्पन्नातून खर्चही फिटत नाही. परिणामी जीवन जगणे असह्य झालेला शेतकरी आत्महत्येला जवळ करू पाहतो. मध्यंतरी शरद जोशी, राजू शेट्टी या शेतकरी नेत्यांच्या नेतृत्वाखाली ऊसाच्या भावासंदर्भात महाराष्ट्रभर आंदोलनं झाली तेव्हा काळजीवाहू शासनकर्त्यांनी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशी प्रांतपरत्वे विभागणी करून उसाचा दर ठरवितानाच शेतकऱ्यांच्या फुटीचे राजकारण केले. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे, गरिबीचे मूळ प्रश्न बाजूलाच ठेवून कर्जमाफी देताना पाच एकरपर्यंतच्या शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी व पाच एकरच्या वर शेती असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली गेली. शासनकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी ठोस व कायमस्वरूपी कोणत्याही उपाययोजना अंमलात आणल्या नाहीत. म्हणून शेतकरी गरिबी हटावोसाठी अफुसारख्या अधिक उत्पन्न देणाऱ्या शेतीला जवळ करू पाहतो.

अफूची शेती करणे लोककल्याणकारी शासनकर्त्यांच्या दृष्टीने व कायद्यान्वये गुन्हा ठरविली जाते. पारंपरिक शेतमालाच्या उत्पादनाला शासनकर्त्यांच्या धोरणाने मातीमोल भाव मिळत असेल व अफूसारख्या पीकातून अधिक उत्पन्न मिळत असेल तर अशा प्रकारची शेती करणे गुन्हा नाही, असा सवाल शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाकडून केला गेला. एवढेच नव्हे तर येणाऱ्या खरीप हंगामापासून जाहीरपणे अफूची लागवड करण्याचा निर्णय घेतला गेला. अर्थात अशा कृतीतून शेतकरी संघटनेला व नेतृत्वाला अफूची लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याचा हेतू नाही; पण समाजस्वास्थ्याचा मक्ता केवळ शेतकऱ्यांकडूनच अपेक्षिला जाणे चुकीचे आहे. एकूणच इंडियन लोककल्याणकारी व्यवस्थेत शाळा, महाविद्यालयांसारख्या संस्कार केंद्राच्या भोवती दारू, बियर शॉपीचे सर्रास परवाने दिले जातात. चौकाचौकात पानटपरीवर बिडी, सिगारेट, गुटखा, तंबाखूसारखे गुंगी आणणारी अंमली पदार्थ सहजपणे विकली जातात. बिअरचे उत्पादन करणारा विजय मल्ल्या 'मद्यसम्राट', 'उदयोगपती' म्हणून नावाजला जातो; पण अफूची शेती करणारा शेतकरी गुन्हेगार म्हणून रंगविला जातो. या संदर्भात संतोष पद्माकर पवार यांच्या 'पिढीपेस्तर प्यादेमात' या कवितासंग्रहातील ओळी मनाला अंतर्मुख करून जातात :

हजारो वर्ष खपल्या तुझ्या पिढ्या
तुझ्या आयाबायांचं झालं शेण
तुझ्या शक्तीचं झालं कंपोस्ट
विकतील मातीमोल किमतीला तुझी वंशावळ
तुझ्यावर भरला पाहिजे अधिकचा खटला
स्वत:ची फसवणूक केल्याचा
तू तर ठेवलीय गिलोटीनखाली मान
आता पडेल पातं चांडाळाच्या हातून
ते पिटतील पिटात टाळ्या
बघतील लाईव्ह तमाशा तुझ्या मरणाचा
तू भारतवर्षातला शेतकरी झाल्याचे
तूला तेव्हा सगळ्यात मोठे दु:ख होईल
तू बिनसरणाचा पेटून उठशील
उभा आहे तिथच राख होऊन जाशील

शेतकरी जीवनाची दारुण शोकांतिका आज अनुभवायला मिळते. एकूणच ऐतखाऊ इंडियन मस्तकातून आलेल्या धोरणाने शेतकरी नागवला गेला, आत्महत्या करू लागला तर अफूची शेती करणारा 'गुन्हेगार' ठरविला गेला. आज समाजव्यवस्थेत शेतकऱ्यांची सर्वच बाजूंनी गळचेपी होताना दिसते. अफूची शेती करणाऱ्याचा 'गुन्हेगार' म्हणून चेहरा दाखविण्यापेक्षा हा 'गुन्हा' करण्यास भाग पाडणाऱ्या व्यवस्थेची अचूक कारण परंपरा शोधून योग्य उपाययोजना अंमलात आणणे गरजेचे ठरते. एका दाण्यातून हजारो दाणे निर्माण करण्याचे बळ अजूनही शेतकरी मनगटात संचारलेले आहे. शेतकऱ्याच्या मनगटात 'हातकडी' घालण्यापेक्षा त्याच्या अपराधी मनाला उभारी देण्याचे काम आपल्या मानसिकतेने व कृतीने करणे गरजेचे ठरते.

**- प्रा. ज्ञानदेव राऊत**
शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी
ता. औसा जि. लातूर
भ्रमणध्वनी ९४२१४८५३८६
dnraut88@rediffmail.como.

■■

# पराभव : काँग्रेस, भाजप आणि अण्णा आंदोलनाचा!



सुधाकर जाधव

सर्व राजकीय पक्ष, राजकीय विश्लेषक आणि निरीक्षक तसेच प्रसार माध्यमे यांचे लक्ष लागून असलेल्या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल घोषित झाले आहेत. निकालावर धुमधडाक्यात चर्चा सुरू आहे. मतदारांनी जेवढे चातुर्य आणि परिपक्वता दाखविली आहे त्याच्या विपरीत या मंडळीच्या चर्चेत भोंगळपण, ठोकळेबाज ठोकताळे आणि त्या हत्ती आणि आंधळ्याच्या गोष्टीप्रमाणे आपल्याला हाताला लागणारा भाग म्हणजे संपूर्ण हत्ती अशा प्रकाराचा भ्रम व्याप्त असल्याने सगळी चर्चा आणि विश्लेषण भ्रमनिरास करणारे आहे. या चर्चेतून जे ठोकताळे मांडण्यात येत आहेत त्यानुसार हा कौल काँग्रेसविरोधी आहे. गेल्या वर्षभरात निर्माण झालेल्या काँग्रेसविरोधी लाटेचा या निवडणुकीवर कितपत परिणाम झाला हे सांगणे कठीण असले तरी निवडणूक विश्लेषकावर मात्र त्या लाटेचा प्रभाव आहे असे अनुमान काढता येते. हे निवडणूक निकाल काँग्रेसच्या आशा आणि अपेक्षांवर पाणी फिरविणारे असले तरी गणिती पद्धतीने विचार केला तर पूर्वीच्या तुलनेत काँग्रेसचे नुकसान झाले ही वास्तविकता नाही. काँग्रेस शासीत गोवा राज्य भाजपकडे गेले असले तरी भाजपशासीत उत्तराखंडात काँग्रेसचे सरकार येणार हे उघड आहे. कारण निवडून आलेले अपक्ष हे काँग्रेसचे बंडखोर आहेत आणि तसेही अपक्ष जो आधी सरकार बनविणार त्याचा बाजूचे असतात. भाजपच्या तुलनेत काँग्रेसचे संख्याबळ एक ने अधिक असल्याने राज्यपालावर सरकार बनविण्यासाठी काँग्रेसला आमंत्रित करण्याचे घटनात्मक बंधन आहे. भाजप आणि बीएसपी मिळूनही बहुमत होत नसल्याने भाजपने सरकार बनविण्याचे कितीही दावे आणि प्रयत्न केले तरी उत्तराखंडात त्यांचे सरकार पुन्हा बनणे अशक्य आहे. तेथे राष्ट्रपती राजवट येऊ शकेल; पण बीजेपीचे सरकार नाही! पंजाबात काँग्रेस पक्षाला स्वतःच्या स्थितीत सुधारणा करण्याची संधी असूनही सुधारणा करता आली नाही हे खरे असले तरी गेल्या निवडणुकीतील जनाधारात व जागांमध्ये घट झाली असेही नाही. मणीपुरात तर हा पक्ष अधिक शक्तिशाली बनला आहे. या निवडणुकीपूर्वी या पाच राज्याच्या विधानसभेत जेवढ्या जागा या पक्षाच्या नावावर होत्या त्यात नगण्य का होईना भरच पडली आहे. काँग्रेसचा पर्याय म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते त्या भाजपची अवस्था काँग्रेसपेक्षाही वाईट झाली आहे इकडे विश्लेषकांचे होत असलेले दुर्लक्ष हा देखील प्रसार माध्यमातील काँग्रेसविरोधी लाटेचा परिणाम मानता येईल. काँग्रेस आणि भाजप यांच्या या निवडणुकीतील कामगिरीची तुलना केली तर गोवा वगळता बाकी चार राज्यात काँग्रेसच्या स्थितीत नगण्य सुधारणा झाली तर भाजपच्या कामगिरीत घसरण झाली आहे. उत्तर प्रदेशासारख्या महत्त्वाच्या राज्यात काँग्रेसच्या जागांत नगण्य वाढ झाली असली तरी मतांच्या टक्केवारीत ४ टक्क्यांची वाढ झाली आहे. उलट भाजपच्या जागाही घटल्या आणि मतांच्या टक्केवारीतही घट झाली. बादल यांच्या शिरोमणी अकाली दलाबरोबर भाजप पुन्हा पंजाबात सत्तेवर येणार असला तरी पंजाबातही भाजपच्या जागेत आणि मतातही घट झाली आहे. उत्तराखंडसारखे राज्य तर हातातून निसटले आहेच. म्हणूनच तटस्थपणे व काटेकोरपणे या निवडणूक निकालाचा निष्कर्ष मोजक्या शब्दांत मांडायचा झाला तर मतदारांनी काँग्रेसबद्दलची निराशा आणि भाजपकडून कोणतीही आशा नसल्याचे मतदानांतून सुस्पष्टपणे दाखवून दिले आहे. मतदारांनी आणखी एक महत्त्वाचा संदेश या मतदानातून दिला आहे. देशातील मतदारांना गृहीत धरण्याची चूक कोणी करू नये. अर्थात हा इशारा अण्णा आंदोलन आणि अण्णा टीमला आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. काँग्रेस आणि भाजपबद्दल मतदारांनी जेवढी कठोर भूमिका घेतली त्यापेक्षा जास्त निर्दयी भूमिका टीम अण्णा आणि त्यांच्या आंदोलनाबद्दल घेतली. काँग्रेस आणि भाजपच्या कामगिरीचा विचार करून त्यांचा निवाडा मतदारांनी केला; पण देशातील यच्चयावत जनतेचे स्वयंघोषित प्रतिनिधी म्हणून वावरणाऱ्या या चमूकडे लक्ष देण्याची गरजसुद्धा मतदारांना वाटली नाही. दुधात पडलेली माशी काढून फेकावी त्या पद्धतीने मतदारांनी टीम अण्णाला या निवडणूक प्रक्रियेतून बाहेर फेकून दिले होते. माध्यमांच्या कृपेने घरा-घरात नव्हे तर जगभरात ज्या आंदोलनाच्या प्रभावाची चर्चा होती त्याचा या निवडणुकीत अजिबात प्रभाव नव्हता. मतदारांनी या निवडणुकीत अण्णा आंदोलनाला पूर्णपणे अदखलपात्र ठरविले हा या निवडणुकीतील सर्वाधिक धक्कादायक निष्कर्ष आहे; पण विश्लेषक व माध्यमे या मुद्द्यावर तोंड उघडायला तयार नाहीत. माध्यमांनी उभ्या केलेल्या भूताला मतदारांनी मानगुटीवर बसू न देता त्याच्याकडे पाठ फिरविली हा खरे तर माध्यमे आणि माध्यमाचार्यांचा पराभव आहे. काँग्रेस आणि भाजप यांच्या पेक्षाही हा केविलवाणा पराभव आहे. या पराभवाची चर्चा करायला माध्यमांना लाज वाटत असेल तर आश्चर्य वाटायला नको. सर्वसामान्य मतदार उन्मादात वाहून न जाता विवेकाने मतदान करतो हे या निवडणूक निकालाने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

### शहामृगी प्रतिक्रिया

आपल्या अस्तित्वावर संकट येत असल्याची चाहूल लागताच शहामृग त्या संकटाचा मुकाबला करण्याऐवजी वाळूत तोंड खुपसून बसतो. त्यामुळे संकट टळेल अशी त्याची गोड गैरसमजूत असते. पाच राज्यांच्या निवडणूक निकालाने काँग्रेस आणि भाजप हे राष्ट्रीय पक्ष आणि अण्णा आंदोलन यांचे अस्तित्व संकटात किंवा संदर्भहीन असल्याचे या निवडणूक निकालांनी दाखवून दिले; पण त्याचा तर्कसंगत व तथ्यसंगत विचार आणि विश्लेषण न करता या तिन्ही गोटांतून व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रिया शहामृगी थाटाच्या आहेत. मतदारांनी आपल्याला झिडकारले हे तथ्य स्वीकारून त्याची कारणमीमांसा करण्याऐवजी 'मला नाही त्याला' असे एकमेकांकडे बोट दाखवून म्हणत आहे. निवडणुकीत संदर्भहीन ठरलेल्या अण्णा आंदोलनाची प्रतिक्रिया हस्यास्पद आणि म्हणून मजेशीर आहे. काँग्रेसने जनलोकपाल बिलाला विरोध केला म्हणून त्या पक्षाचा या निवडणुकीत लोकांनी पराभव केला अशी छापील प्रतिक्रिया अण्णा मंडळी व्यक्त करीत आहे. जनलोकपालचा लोकसभेत छातीठोकपणे विरोध करणाऱ्या मुलायमसिंह यांना मतदारांनी का डोक्यावर घेतले याचे उत्तर ही मंडळी देणार नाहीत. शिवाय जनलोकपाल बिलाचा झेंडा आपल्या खांद्यावर घेणारा आणि अण्णा हजारे यांनी कितीही लाथा मारल्या तरी बेशरमपणे त्यांचे समर्थन करणाऱ्या भाजपचा पराभव का झाला याचेही उत्तर या मंडळींनी दिले पाहिजे. एवढेच नाही तर ज्या उत्तराखंडच्या लोकायुक्त कायद्याचे आदर्श कायदा म्हणून कौतुक आणि प्रचार करण्यात टीम अण्णाने कोणतीही कसर बाकी ठेवली नाही त्या उत्तराखंडात भाजपपेक्षा काँग्रेसला अधिक मते आणि जागा देऊन तो कायदा मतदारांनी अव्हेरला असा निष्कर्ष अधिक तर्कसंगत ठरतो. निवडणूक आणि अण्णा हजारेंचा आशिर्वाद डोळ्यांपुढे ठेवून तुलनेने स्वच्छ प्रतिमेच्या खंडुरी यांना भाजपने मुख्यमंत्री बनवून त्यांच्या करवी हा कथित आदर्श कायदा आणण्यात आला त्या मुख्यमंत्री खंडुरीनाच मतदारांनी चारी मुंड्या चीत केले याचा अर्थ अण्णा मंडळींनी समजून घेण्याची गरज आहे. ज्यांना मागच्या दाराने सत्ता उपभोगायची लालसा आहे त्यांना लोकपालसारख्या मुद्द्याचे महत्त्व आहे; पण जनतेचे प्रश्न वेगळे आहेत आणि ते प्रश्न लोकपालसारखा नोकरशाह नाही तर आपण निवडून दिलेला प्रतिनिधीच सोडवू शकेल हा त्यांचा विश्वास कायम

आहे हेच या निवडणुकीने दाखवून दिले आहे. आज निवडून दिलेला प्रतिनिधी बेजबाबदार वागला तर त्याच्यावरचा उपाय त्याला बदलने हा आहे, त्याच्या डोक्यावर लोकपाल आणून बसविणे नाही हा धडा मतदारांनी अण्णा टीमला दिला आहे; पण सर्वसामान्य मतदारांकडून ते धडे घेऊ लागले तर मग त्यांना सिव्हील कसे म्हणायचे! भाजपची प्रतिक्रियादेखील अशीच आहे. आपल्याला मतदारांनी नाकारले याचा विषाद न बाळगता हा पक्ष काँग्रेसचे कसे नाक कापले गेले म्हणून आनंदोत्सव साजरा करू लागला आहे. गेल्या वर्षभरात काँग्रेसचे बुडत्याचे पाय खोलात म्हणतात तसे खोल खोल चालले असताना त्याची जागा घेण्याचा गंभीर प्रयत्न करण्याऐवजी तो बुडाला की आपल्या शिवाय कोण? या भ्रमात नाचगाण्यात हा पक्ष रमला आहे; पण मतदारांनी स्पष्टपणे बजावले आहे की, काँग्रेस नाही म्हणजे बीजेपी आपोआप सत्तेत येईल ही समजूत चुकीची आहे; पण गडकरींचा खोटा खोटा आनंदोत्सव पाहिला की हा पक्ष पर्याय म्हणून उभा राहण्याबाबत गंभीर आहे असे दिसत नाही. या निवडणूक निकालाने मतदारांनी काँग्रेसपुढे उभे केलेले प्रश्न अधिक अवघड आणि नाजूक आहेत. सव्वाशे वर्षांची परंपरा सांगणाऱ्या या पक्षाचा नेतृत्वाबाबतचा भ्रम मतदारांनी दूर केला आहे. या पक्षाचे सरकारातील नेतृत्त्व अत्यंत दुबळेच नाही तर दुधखुळे आहे, सरकारातील लोकांची जनतेशी नाळ तुटली आहे याची जाणीव पक्ष कार्यकर्त्यांना गेल्या वर्षभरात झपाट्याने झाली; पण या परिस्थितीतून सोनिया आणि राहूल गांधी मार्ग काढू शकतील असा सामान्य कार्यकर्त्याचा विश्वास होता; पण सोनिया गांधी आजारपणाने मागे पडल्या, पण त्याहीपेक्षा त्या सल्लागार परिषदेतील स्वयंसेवी संस्थांच्या गराड्यात अडकल्याने लोकापासून दूर गेल्या. त्यामुळे पक्षाची सगळी भिस्त राहुल गांधींवर होती. उत्तर प्रदेशात राहुल गांधी चमत्कार करून दाखवतील आणि मग त्यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा निवडणूक लढणे आणि जिंकणे सोपे जाईल हा काँग्रेसचा होरा होता. निष्क्रीय व निष्प्रभ सरकार असले तरी गांधी घराण्याचा राजपुत्र आपल्याला तारून नेईल हा विश्वास या निवडणुकीत मतदारांनी ढासळून लावला आहे. राहुल गांधींना नाकारून मतदारांनी जो संदेश काँग्रेसला दिला आहे त्याने काँग्रेसचे धाबे सर्वांत जास्त दणाणले आहे. काँग्रेसच्या नेत्यांची या निवडणूक निकालावरील प्रतिक्रिया ते किती गोंधळले आणि सैरभैर झाले आहेत हे दर्शविणाऱ्या आहेत. स्वत:ची स्थिती विसरून बीजेपीने जसा काँग्रेसच्या पराभवावर आनंदोत्सव साजरा केला, तसाच प्रयत्न काँग्रेसनेही केला. बीजेपीच्या तुलनेत किंचित सरस कामगिरी होऊनही बीजेपीची खिल्ली उडवीत असतानाही त्यांचे चेहरे पडलेलेच होते. राहुलला मतदारांनी नाकारले हे सत्य पचत नसल्याचे त्यांचा चेहरा सांगत होता. मतदारांनी घराणेशाही नाकारली असा अर्थ काढणेसुद्धा खरे ठरणार नाही. तसे असते तर मतदारांनी मुलायम पुत्राला डोक्यावर घेतले नसते. म्हणूनच राहुल गांधींना का नाकारले याचा वेगळा विचार केला पाहिजे. काँग्रेस पक्षाचे सरकार एवढे निष्क्रीय व निष्प्रभ असूनही राहुल गांधी त्यात बदल घडवून आणण्याची क्षमता बाळगत नसतील तर ते उत्तर प्रदेशात काय दिवे लावणार असे मतदारांना वाटत असेल तर त्यात त्यांचे चुकले कोठे? पण हे समजून न घेता हा राहुल गांधींचा पराभव नाही हे सांगण्यावर काँग्रेसजन शक्ती खर्च करीत आहेत. सरकार बदला नाही तर घरी बसा हाच मतदारांनी काँग्रेसला दिलेला संदेश आहे.

अस्थिरतेची चाहूल

केंद्र सरकारच्या जडणघडणीत उत्तर प्रदेशची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे आणि या निवडणुकीत इथल्या मतदारांनी दोन्ही राष्ट्रीय पक्षांना नाकारले आहे. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांची कामगिरी मतदारांनी नाकारावी अशीच राहिली आहे यात शंकाच नाही. काँग्रेसला लोकांच्या समस्याप्रती संवेदनशील, जबाबदार आणि पारदर्शी सरकार देण्यात अपयश आले आहे आणि पक्षश्रेष्ठी हे अपयश उघड्या डोळ्याने निष्क्रियपणे पाहात बसले आहेत ही बाब लोकांच्या सहनशक्तीचा अंत करणारी ठरली आहे. दुसरीकडे भारतीय जनता पक्ष समर्थ विरोधी पक्ष म्हणून कधीच लोकांपुढे आला नाही. या पक्षाची भूमिका संसदेत नकारार्थी तर संसदेबाहेर संधीसाधूपणाची राहिली आहे. समर्थ विरोधी पक्षाची भूमिका भाजपपेक्षा अण्णा हजारे आणि बाबा रामदेव यांनीच प्रभावीपणे पार पाडल्याचे लोकांनी पाहिले आहे. अण्णा आणि बाबांच्या चरणी लीन होऊन त्यांच्या कष्टाचे फळ गिळंकृत करण्याचा भाजपचा प्रयत्न मतदारांना पसंत पडला नाही हे उघड आहे. दुसरीकडे सत्तेशी आम्हाला काही देणे घेणे नाही असे म्हणत प्रत्यक्षात विरोधी पक्षासारखे काम अण्णा आणि बाबा करीत आहेत हेसुद्धा मतदारांना न आवडल्याने मतदारांनी त्यांच्याकडेही पाठ फिरविली आहे. गेले वर्षभर काँग्रेस, भाजप, अण्णा आणि बाबा यांनी मिळून देशभर जे गोंधळाचे वातावरण निर्माण केले आहे त्यावर मतदारांनी आपल्या नापसंतीची मोहोर स्पष्टपणे उमटविली आहे. प्रत्येकानी आपल्या चुका दुरुस्त केल्या नाहीत तर मतदार त्यांच्यावर विसंबून न राहता उपलब्ध पर्याय निवडतील याची चुणूक मतदारांनी दाखवून दिली आहे. पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीला जवळपास २ वर्षांचा अवधी असल्याने काँग्रेस आणि भाजपकडे आपल्या चुका सुधारून प्रामाणिकपणे काम करून जनतेचा विश्वास प्राप्त करण्याची संधी आहे. त्यांच्या आजच्या भूमिका लक्षात घेतल्या तर त्यांना चुका समजूनच घ्यायच्या नाही आहेत असे दिसते. ताजा निवडणूक निकाल आणि काँग्रेस-भाजपची त्यावरील प्रतिक्रिया लक्षात घेतली तर देशाला या दोहोंपेक्षा वेगळ्या राष्ट्रीय पर्यायाची गरज आहे हे लक्षात येते. अण्णा हजारेंच्या आंदोलनाने असा पर्याय उभा करण्याची संधी निर्माण झाली होती; पण आंदोलनाचे नेतृत्व फारच थिटे पडले आणि नेतृत्वाच्या अहंकाराच्या पुरात पर्याय निर्माण न करताच आंदोलन वाहून गेले. बाबा आणि अण्णांच्या प्रतिक्रिया पहिल्या तर त्यांनाही काँग्रेसचे नाक कापले यातच आनंद आहे. पर्यायाची फिकीर नाही. भाजपवर त्यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरला नसला तरी अण्णा आणि बाबांचा अजून मोह्भंग झालेला दिसत नाही. जनतेचा मात्र मोहभंग झाला आहे. काँग्रेस-भाजप सुधारली नाही किंवा नवीन पर्याय उभा राहिला नाही तर देशात पुन्हा प्रादेशिक सुभेदार बलवान होतील आणि केंद्रात प्रादेशिक पक्षांचे कडबोळे सरकार येईल. व्ही. पी. सिंह, चंद्रशेखर, चरणसिंग, देवेगौडा यांनी अल्पकाळ राज्य करून आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या धर्तीवर केंद्रात सरकार चालवून देशात जी अस्थिरता निर्माण केली होती त्या धर्तीवर मुलायम, ममता, जया, नितीश हे नव्या अस्थिरतेचे जनक ठरतील. उत्तर प्रदेशात काँग्रेसच्या समर्थनावर मुलायम सरकार आले तर केंद्रात सणकी ममताऐवजी मुलायमच्या समर्थनाने स्थिरता येईल ही शक्यता आता मावळली आहे. आतापर्यंत केंद्र सरकारचे बाहेरून समर्थन करणारे मुलायमसिंग पुढे तसेच करतील याची शक्यता नाही. कारण लोकसभेच्या लवकर निवडणुका होणे ही मुलायमसिंगसाठी सर्वाधिक फायद्याची गोष्ट ठरणार आहे. स्वबळावर ५० च्या वर खासदार निवडून आणून मुलायमसिंग पंतप्रधानपदाचे प्रबळ दावेदार ठरणार असल्याने पुढचा कालखंड अस्थिरतेचा राहू शकतो आणि अस्थिरतेचा पाहिला बळी विकास ठरण्याची दांडगी शक्यता आहे. मतदारांनी नव्या राष्ट्रीय पर्यायाची निकड लक्षात आणून देण्याचे काम चोखपणे बजावले आहे. लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या राजकीयदृष्ट्या जागृत आणि संवेदनशील नागरिकांनी आणि तरुणांनी भ्रष्टाचार, काळा पैसा अशा सवंग घोषणाबाजीच्या आहारी न जाता नवा राजकीय राष्ट्रीय पर्याय देण्यासाठी कंबर कसली पाहिजे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# खसखशीच्या शेतीला बत्तीस शिराळा येथे मा. शरद जोशींची भेट





**शीतल राजोबा यांजकडून :** मा. खा. शरद जोशी दि. २८ व २९ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर (खासगी) आले होते. सध्या खसखस पीकावर सरकारने धाडी टाकून खसखस पीक जप्त करून संबंधित शेतकऱ्यांना अटका केल्या. या विषयावर दि. २९ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता शरद जोशी यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना शरद जोशी म्हणाले की, शेतकऱ्यांला कापूस, कांदा, ज्वारी, ऊस, कडधान्ये पिकवून जर आत्महत्या करण्याची वेळ सरकार आणते आहे, तर आत्महत्या करणे, हातामध्ये स्टेनगन घेऊन नक्षलवादी बनणे किंवा शेती सोडून देणे हे पर्याय शेतकऱ्यांनी न पत्करता खसखसीचे पीक घेत आहेत ही फार चांगली गोष्ट आहे. खसखसीच्या बोंडांपासून अफू होत असेल तर शेतकऱ्याला त्याच्याशी काही देणे-घेणे नाही. त्यापासून शेतकऱ्याला चार पैसे मिळतात. त्यांचा उदरनिर्वाह चालतो.

देशामध्ये पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, तामिळनाडू इत्यादी राज्यांमध्ये अफू या पिकाला परवानगी आहे. महाराष्ट्रामध्येच यास बंदी का? एका बाजूला अफू तयार करण्याचे कारखाने राजरोस चालू आहेत. त्यावर शासन कारवाई करत नाही. उलट खसखस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना अटका करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करत आहे. पुढे बोलताना शरद जोशी म्हणाले, उसापासून दारू बनते, संत्रा, काजू यांपासून दारू बनते म्हणून ऊस, संत्रा, काजू पिकवणे बंद केले पाहिजे.

सरकार चोर सोडून सन्याशाला फाशी या उक्तीप्रमाणे आपले काम करत आहे. जोशी यांनी पत्रकारांना (आपले सर्व ठरलेले कामकाज रद्द करून) सांगितले की, पत्रकार परिषद संपताच मी बत्तीस शिराळ्याला खसखसीच्या शेतीला व शेतकऱ्यांना भेटण्यास जाणार आहे. पत्रकारांनी राजकीय विषयाला हात घालत राजू शेट्टींनी काँग्रेसला पाठिंबा दिला आहे हे कसे काय, असे विचारले असता मा. शरद म्हणाले की, मागे नागपूरला शेतकरी संघटनेच्या बैठकीमध्ये राजू शेट्टी म्हणाले होते काँग्रेस बरोबर तेवढी युती करू नका. पुढे तेच काँग्रेसबरोबर अंतर्गत सोबत होते हे आज उघड झाले ते बरे झाले. पत्रकारांनी पुन्हा विचारले की, राजू शेट्टी निवडून आल्यानंतर कार्यकर्त्यांना पदे द्यावी लागतात. त्यावर बोलताना शरद जोशी म्हणाले, आमची संघटना व पक्षातील कार्यकर्ते कोणत्याही मोहाने काम करत नाहीत. तरीही आमची कार्यकर्त्यांची मोठी फळी कार्यरत आहे. त्यांच्या पक्षाचे निर्णय ते घेतील, मी बोलण्याचा संबंध नाही. पत्रकार परिषद संपताच शरद जोशी, प्रदेशाध्यक्ष रवी देवांग, स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. आ. वामनराव चटप, युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संजय कोले, माजी अध्यक्ष जयपालअण्णा फराटे, बत्तीस शिराळ्यास रवाना झाले. ठीक ४ वाजता तालुकाप्रमुख मारुतराव नलावडे यांच्या घरी चहापान करून तालुक्यातील नाटोली या गावी अफूची शेती पाहण्यासाठी निघाले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

नाटोली तालुका बत्तीस शिराळा, जिल्हा सांगली येथील धाड टाकलेल्या शेतीस शरद जोशींनी भेट देऊन या पिकापासून खसखस कशी तयार होते हे समजावून घेतले. संपूर्ण शेतीच पाहणी केली. यावेळी वृत्तवाहिन्यांशी बोलताना रवि देवांग म्हणाले, शेतकऱ्याला बाजरामध्ये कवडी मोलाचे भाव मिळत असतील तर आत्महत्या करण्यापेक्षा खसखशीचे मसाल्याचे पीक घेतले तर बिघडले कुठे. शासन गरीब शेतकऱ्यांवर अन्याय करत आहे. याचा आम्ही तीव्र निषेध करतो. या विरोधात तीव्र लढा उभारणार. त्याचवेळी शरद जोशी म्हणाले, खसखस पिकवणाऱ्या ज्या शेतकऱ्यांवर कारवाई झाली आहे. त्यांच्या बाजूने आम्ही वकिलांची फळी उभारू सर्वोच्च न्यायालयातही नामवंत वकील उभा करू. आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. सरकारने या शेतीला परवानगी दिली पाहिजे. यासाठीचे परवाने देऊन सरकारला यापासून कर मिळणार याचा सरकारने विचार करावा. चोरी छुपे अफू तयार करणारे कारखाने सील करावेत. नाहक शेतकऱ्यांचा बळी देऊ नये. यावेळी घोषणा देण्यात आल्या 'खसखस आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची', 'कमाने वाला खायेगा लुटने वाला जायेगा', 'शरद जोशी झिंदाबाद', 'शेतकरी संघटनेचा विजय असो.'

यावेळी शेतकरी संघटनेचे सांगली जिल्हाप्रमुख शीतल राजोबा, कोल्हापूर जिल्हाप्रमुख ज्ञानदेव साळुंखे, ज्येष्ठ कार्यकर्ते पी. जी. पाटील वाकरेकर, स्व.भा.प. मिरज तालुकाप्रमुख रावसो दळवी, अल्लाउद्दीन जमादार, तानाजी चव्हाण, मुसा देसाई, अनिल पाटील टोले, शार्दुल सकळे, एकनाथ कापसे, चंद्रकांत पाटील, वि. कदम, सोन्या मगदूम, परशूराम माळी, केडगे टेलर, अजित पाटील, आदम मुजावर यांसह मोठ्या संख्येने शेतकरी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पुन्हा सविनय कायदेभंग आंदोलन




संयुक्त राज्यकार्यकारिणी बैठक व परिसंवाद, जालना

**जालना :** कापूस निर्यातबंदी लागू केल्यामुळे कापसाचे भाव कमी झाले आहेत. त्यामुळेच शेतकरी फायद्याची शेती म्हणून खसखशीसारख्या पिकांची निवड करीत आहेत. मात्र, सरकारने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे, अशा स्थितीत शेतकरी संघटनेने सरकारविरोधात सविनय कायदेभंग आंदोलन पुकारण्याचा इशारा दिला आहे. शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकारिणीची दोन दिवसीय बैठक जालन्यात सुरू असून बैठकीच्या पहिल्याच दिवशी या आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे.

२०१४ च्या विधानसभा आणि त्यानंतर होणाऱ्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून स्वतंत्र भारत पक्ष आणि शेतकरी संघटनेच्या वतीने नियोजन केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून पक्ष आणि संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक अध्यक्ष शरद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जालन्यात बैठक संपन्न झाली. शनिवारी पहिला दिवस होता. यासाठी राज्यभरातून कार्यकर्ते उपस्थित झाले आहेत. यावेळी 'लोकाशाहीचे विकेंद्रीकरण' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन मुंबई येथील ॲडल्ट एज्युकेशन सोसायटीच्या विद्यमाने करण्यात आले होते.

चर्चासत्रात मान्यवरांनी लोकशाहीबाबत मौलिक विचार मांडले. दुपारच्या सत्रात स्थानिक स्वराज्य संस्थांत विजयी झालेल्या स्वतंत्र भारत पक्षाच्या उमेदवारांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद जोशी, प्रदेशाध्यक्ष वामनराव चटप, शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवी देवांग, गुणवंत पाटील हंगरगेकर, महिला आघाडीच्या शैलजा देशपांडे, कैलास तौर, गजानन बंगाळे आदींची उपस्थिती होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या रणनीतीबाबत मा. शरद जोशी, आ. वामनराव चटप यांनी मार्गदर्शन केले.आगामी विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्ष सर्व ताकदीनिशी उतरणार असल्याचे शरद जोशी यांनी सांगितले. विधानसभेसाठी राज्यभरातून २८ उमेदवार उभे केले जातील. त्यापैकी १० उमेदवार विजयी होतील, तर लोकसभेला १० पैकी किमान दोन उमेदवार विजयी होतील असे नियोजन केले जात असल्याचे प्रदेशाध्यक्ष वामनराव चटप यांनी सांगितले. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यात कापूस निर्यातबंदी आणि अफूप्रकरणाची सर्वाधिक चर्चा झाली. त्यामुळे पहिल्या दिवसाच्या शेवटच्या सत्रात या दोन्ही प्रश्नांवर सविनय कायदेभंग चळवळ उभारण्याचा इशारा प्रदेशाध्यक्ष वामनराव चटप यांनी दिला.

**खसखस लागवडीचे मार्गदर्शन करणार**

ज्या पिकाला चांगला भाव मिळतो, ते पीक घेण्याचा शेतकऱ्याला अधिकार आहे, शेतकरी खसखशीचे पीक घेत असताना सरकार अफू म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल करीत आहे. आम्ही बियाणे कायद्याचा अभ्यास केला असून शेतकऱ्यांनी खसखस लावावी यासाठी त्यांना कायदेशीर मार्गदर्शन करणार आहोत. सरकार कायद्याचा धाक दाखवत असेल तर कायदेभंग करण्याची आमची तयारी आहे.

**- मा. वामनराव चटप.**



# खसखस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवरील फौजदारी खटले मागे घेण्याची मागणी

**बीड :** बीड जिल्ह्यात कापूस व ऊस ही दोन प्रमुख पिके आहेत. सरकारी धोरणांमुळे ही दोन्ही पिके आज परवडत नाहीत. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे व आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. आज शेती व्यवसायावर विविध बंधने आहेत. निर्यातबंदी, झोनबंदी, लेव्ही, इथेनॉल तयार करण्यास बंदी, विविध राज्यांत पिके पाठवण्याची बंदी, एकाधिकार खरेदी, बी.टी. कापूस व वांग्याला विरोध, बाजार स्वातंत्र्यावर बंदी, जनुकीय तंत्रज्ञानाला बंदी, बँकांची व सोसायट्यांकडून होणारी आर्थिक कोंडी ही सर्व कारणे शेतकऱ्यांची अडवणूक करणारी आहेत. आता शेतकऱ्यांवर आत्महत्या करणे किंवा हातात बंदुका घेऊन नक्षलवादी बनणे हेच पर्याय उपलब्ध आहेत.

खसखसचे पीक घेणे हे त्यातल्या त्यात किफायतशीर वाटत आहे. खसखस पिकवण्याची रीतसर परवानगी शेतकरी संघटना, बीड यांनी माजलगाव तहसिलदाराकडे केली आहे. तो एक व्यवसाय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये व्यवसाय स्वातंत्र्य व त्यातून नफा कमविण्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे व म्हणून शासनाने शेतकऱ्यांच्या व्यवसाय स्वातंत्र्यावर निर्बंध आणू नयेत. खसखसची शेती नष्ट करू नये व शेतकऱ्यांवरील सर्व फौजदारी खटले मागे घ्यावे, अशी मागणी असलेले निवेदन बीड जिल्हा शेतकरी संघटनेने विभागीय आयुक्तांकडे केली. याप्रसंगी श्री. कैलास तवार (शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष), श्री. सुभाष मायकर, ॲड. रामराव नाटकर, श्री. रमेश शिंदे, श्री. नाना फफाळ, श्री. केशव फफाळ, श्री. गंगाधर गायकवाड, श्री. संतोष तांदळे, श्री. शेख रशीद, श्री. जी.पी. कदम, श्री. गोविंद सोनी आदींसह शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वतंत्र भारत पक्षाचे जि. प. व पं. स. निवडणुकीतील विजयी पाईक

## जिल्हा परिषद

| मतदारसंघ | जिल्हा | विजयी उमेदवार | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| आवाडपूर नारंदा, ता. कोरपना | चंद्रपूर | नीलकंठ विठोबा कोरांगे | ५३९१ |
| आर्वी पाचगाव, ता. राजुरा | चंद्रपूर | भीमराव गोविंदा पुसाम | ४७५३ |
| विरुळ | वर्धा | गजानन निकम | ३२३८ |
| सावली | वर्धा | चंद्रमणी भगत | २०७८ |
| गिरड | वर्धा | वीणा राऊत | ३४९१ |

## पंचायत समिती

| मतदारसंघ | जिल्हा | विजयी उमेदवार | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| नारंदा, ता. कोरपना | चंद्रपूर | संध्या विठ्ठलराव सोयाम | २९९७ |
| आवाडपूर, ता. कोरपना | चंद्रपूर | रविंद्र तुळशीराम गोखरे | २८९९ |
| बाखर्डी, ता. कोरपना | चंद्रपूर | यादव श्रीराम चटप | २०२८ |
| गोवरी, ता. राजुरा | चंद्रपूर | बंडू सोमा कोडापे | २२२२ |
| आर्वी, ता. राजुरा | चंद्रपूर | सिंधुताई विनोद बारसिंगे | २७२९ |
| पाचगाव, ता. राजुरा | चंद्रपूर | नरेंद्र भिवाजी काकडे | २२०० |
| डोंगरगाव | चंद्रपूर | चंद्रकला आबाजी ढवस | २२१७ |
| विरुळ | वर्धा | ताराबाई ताडाम | २०३७ |
| नांदगाव | वर्धा | सुजित बुरबुरे | ११९८ |
| मोहगाव | वर्धा | दमडू मडावी | २०६५ |
| मेरा, खुर्द | बुलढाणा | भानुदास घुबे | ३२५५ |


शेतकरी महिला आघाडी

# शेतकरीविरोधी धोरणांच्या निषेधार्थ कृषी आयुक्तालयावर भव्य मोर्चा

प्रचंड संख्येने सामील व्हा !!

सोमवार, दि. १९ मार्च २०१२

मोर्चाचा मार्ग : मध्यवर्ती रेल्वे स्टेशन ते कृषि आयुक्तालय, पुणे.

विनित

**मा. रवि देवांग**
अध्यक्ष शेतकरी संघटना

**मा. वामनराव चटप**
प्रदेशाध्यक्ष, स्वभाप

**मा.सौ. शैलजाताई देशपांडे**
अध्यक्ष, महिला आघाडी शेतकरी संघटना